# वि. स. खांडेकरांचा जीवन परिचय

वि. स. खांडेकरांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगलीला आजोळी माईणकरांच्या घरी झाला. त्यांचे जन्म नाव गणेश असून मूळ घराणे दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी येथे होते. गोमंतकातील म्हार्दोळ येथील श्री म्हाळसादेवी हे त्यांचे कुलदैवत.

वयाच्या ९ व्या वर्षी भाऊंनी सांगली येथील हायस्कूलमध्ये इंग्रजी माध्यमासाठी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला. नाटक पाहण्याचीही त्यांना विशेष आवड होती. त्यामुळे त्यांनी बालवयातच ‘शारदा’, ‘भाऊबंदकी’ , ‘सवाई माधवराव यांचा मृत्यू’ यासारखी नाटके पाहिली. वडिलांच्या मृत्युनंतर पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शिकवण्या, शिष्यवृत्ती आणि डॉ. देव यांच्याकडून मिळणारी किरकोळ मदत यावर भाऊंची गुजराण होत होती.

१३ जानेवारी १९१६ रोजी गणेशचे चुलत चुलते सखारामपंत यांनी गणेशला दत्तक घेतले आणि गणेश आत्माराम खांडेकर ऐवजी विष्णू सखाराम खांडेकर असे नामविधान झाले. सावंतवाडीतील भटवाडीमधल्या सखारामपंतांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. त्यामुळे अर्थातच , पुढील शिक्षण उत्तमरीतीने पार पडेल, पैशांची चुणचुण भासणार नाही अशा अपेक्षा गणेशने उराशी बाळगल्या होत्या. दत्तक आई व बहीण वारणाआक्का यांचे खूप प्रेम त्यांना मिळाले. सखारामपंतांशी मात्र भाऊंचे फारसे पटत नव्हते. वरचेवर खटके उडत होते.

भाऊंना अनेकदा आपल्या दारिद्र्याचा प्रश्न भेडसावत असे. परंतु शिरोड्याच्या ‘ट्युटोरिअल इंग्लिश स्कूल’ येथील शिक्षक घनश्याम आजगावकर हे खांडेकरांना मास्तरकीचे आमंत्रण घेवून आल्यामुळे त्यांच्या चरितार्थाची सोय लागून त्यांना आर्थिक दिलासा मिळाला होता. वीस रूपये पगाराची नोकरी पत्करून भाऊ ट्युटोरिअल इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक झाले. बालवयापासूनच त्यांचे लेखन व वाचन अव्याहतपणे सुरूच होते.

असोगे येथील श्री मणेरीकरांची मनू हिच्याशी १० जानेवारी १९२९ रोजी गोरज मुहूर्तावर भाऊंचा विवाह झाला. एप्रिल १९२९ मध्ये सांगली येथील ‘त्रिवेणी बर्वे अॅन्ड सन्स’ यांनी खांडेकरांचा पहिला कथासंग्रह ‘नवमल्लिका’ प्रसिद्ध केला. इ. स. १९३० मध्ये ‘हृदयाची हाक’ ही भाऊंची पहिली कादंबरी प्रकाशक - भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई यांनी प्रकाशित केली. चरितार्थ चालविण्यासाठी खांडेकरांनी चित्रपटासाठी कथा लिहिण्याचे काम पत्करले. ‘छाया’ ही १९३६ मधील सर्वोत्कृष्ट चित्रपट कथा ठरली.

सन १९५८ ते १९६७ या काळातील मराठीतील सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणून ‘ययाति’ कादंबरीला भारतीय ज्ञानपीठाचा १९७४ चा पुरस्कार जाहीर झाला. २६ फेब्रुवारी १९७६ रोजी दिल्ली येथे विज्ञान भवनात ज्ञानपीठ पुरस्कार वितरण समारंभाचा भव्य व शानदार सोहळा पार पडला. हिंदीच्या विख्यात कवयित्री श्रीमती महादेवी वर्मा यांच्या हस्ते पारितोषिक, वाग्देवीची मूर्ती, एक लाखाचा चेक इ. भाऊंना अर्पण करण्यात आले. ज्ञानपीठ पुरस्कार हा भारतीय साहित्यक्षेत्रातला सर्वोच्च बहुमान आहे. १४ मे १९७६ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या भव्य प्रांगणात भाऊसाहेब वि. स. खांडेकर यांना डि. लिट. ही सन्माननीय पदवी देण्याचा विशेष पदवी प्रदान समारंभ कुलगुरू बॅ. पी. जी. पाटील यांच्या हस्ते साजरा झाला.

खांडेकरांचे डोळ्याचे परेशन अयशस्वी झाले. दोन्ही डोळयांनी अधू असलेले भाऊ एका डोळयाने पूर्णतः अंध झाले होते. सामाजिक दु: खाची तळमळ असणाऱ्या महान साहित्यिकाच्या आयुष्याचे अंतिम क्षण सुखमय करण्याऐवजी त्यांच्यावर नियतीने क्रूर प्रहार केला होता. २९ ऑगस्ट १९७६ रोजी मेंदूतील रक्तस्त्रावाने खांडेकरांची शुद्ध हरपली. त्यांना मिरज येथील बॅनलेस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या थोर साहित्यिकाचे २ सप्टेंबर १९७६ रोजी पहाटे ४.४० वाजता बेशुध्दावस्थेतच निधन झाले.

माणुसकीच्या धर्माचा पुरस्कर्ता, माणुसकीच्या तत्वज्ञानाचा साक्षात नंदादीप, साहित्याचे अनभिषिक्त सम्राट, उत्तम व श्रेष्ठ समाजशिक्षक, थोर साहित्यिक यासारख्या साहित्यक्षेत्रातील विविध पदव्या वि. स. खांडेकरांना श्रध्दांजलीच्या रूपाने बहाल करण्यात आल्या होत्या.

# वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास

## ( V. S. Khandekar Yanchya Nivdak Kathasangrahancha Abhyas)

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**सायली प्रभाकर परब**

हजेरी क्र. 22P0190019

ABC ID 481193662557

पी. आर 201809239

मार्गदर्शक

**प्रा. विनायक लक्ष्मण बापट**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा



गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 - 2024**

# V. S. KHANDEKAR YANCHYA NIVDAK KATHASANGRAHANCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Saylee Prabhakar Parab**

Seat No: 22P0190019
ABC ID: 481193662557
PRN: 201809239

Under the supervision of

**Proff. Vinayak Bapat**
(Assistant Professor)
**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**
**2023 - 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Vinayak L. Bapat and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations / experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Parab

(Saylee P. Parab)

Signature and Name of Student

Seat no: 22PO190019

Date: 16 April 2024

Place: Goa University

# COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास" is a bonafide work carried out by Ms Saylee Prabhakar Parab under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

(Vinayak L. Bapat)

Signature and Name of Supervising Teacher

Date: 16 April 2024

Signature of Dean of the School

Date: 16 April 2024

Place: Goa University

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Dept Stamp

# वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| मनोगत | | I. |
| प्रस्तावना | | २-७ |
| १. | लघुकथा : संकल्पना व स्वरूप, इतिहास | ८-२५ |
| २. | वि. स. खांडेकरांच्या कथेमधून दिसून येणारी जीवनवादी दृष्टी | २६-३९ |
| ३. | वि. स. खांडेकरांच्या कथालेखनामधून दिसून येणारा वास्तववाद | ४०-४९ |
| ४. | वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या | ५०-५९ |
| ५. | निष्कर्ष | ६०-६४ |
| परिशिष्ट | | ६५-६८ |
| संदर्भसूची | | ६९-७० |

# ऋणनिर्देश

'वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास' या विषयावरील संशोधनाचा प्रवास माझ्यासाठी तसा खडतर नव्हता. या विषयाची निवड करत असताना मला फार विचार करावा लागला कारण याअगोदर माझं वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांचं तसं वाचन झालं नव्हतं. मी खांडेकरांची ययाति कादंबरी वाचली होती. गेल्या वर्षी जेव्हा आम्हाला सांगितलं की तुम्हाला संशोधन करायचं आहे तेव्हा मला पहिलं नाव सुचलं ते खांडेकरांचं. खांडेकरांनी विपुल कथालेखन केले. त्यांच्या कथासंग्रहांवर अजून तसा सखोल अभ्यास झालेला नाही. तेव्हा या विषयावर संशोधन करायचं असं मी ठरवलं. संशोधनासाठी त्यांचे मला कथासंग्रह उपलब्ध झाले व भरपूर माहितीही मिळाली. देवाच्या कृपेने आज हे संशोधन पूर्णत्वास पोहोचत आहे.

या विषयाची निवड करण्यासाठी मला प्रा. पूर्वा पंडित वस्त या शिक्षिकेचं मार्गदर्शन लाभलं. या विषयावर कसं संशोधन करायचं, प्रकरणांची मांडणी कशी करायची यासाठी तिने मला चांगलं व अचूक मार्गदर्शन केलं. संशोधन प्रस्ताव करत असताना मला तिचं मार्गदर्शन लाभलं त्यासाठी मी तिची मनापासून अत्यंत आभारी आहे. या विषयावर संशोधन करत असताना मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयाची खूप मदत झाली त्यामुळे या ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचं मी मनापासून आभार मानते. या विषयावर संशोधनं करत असतानाचा माझा अनुभव चांगला होता. माहिती मिळवण्यासाठी मला खूप वाचन करावं लागलं. यानिमित्ताने वि. स. खांडेकरांचे कथासंग्रह वाचून झाले. अवांतर वाचन झाल्याकारणाने त्यांनी आपल्या कथासंग्रहात काय मांडलं आहे हे चांगल्यापध्दतीने मला माझ्या प्रबंधात मांडता आलं.

या विषयावर संशोधन करत असताना मला माझे मार्गदर्शक प्रा. विनायक बापट सरांचं वेळोवेळी मार्गदर्शन लाभलं. प्रकरणांमध्ये माहितीची मांडणी करत असताना त्यात काही चुका झाल्या तर सर ते बरोबर कसं लिहायचं याबाबतीत अचूक मार्गदर्शन करायचे. हे संशोधन करत असताना मला काही अडचणी आल्या तर मी सरांना विचारायचे. त्यांचं मला चांगलं मार्गदर्शन लाभलं. त्यांच्या सहकार्यामुळेच आज हा प्रबंध पूर्णत्वास पोहोचत आहे. त्यामुळे मी त्यांचीपण मनापासून आभारी आहे. सदर संशोधन विषयातील प्रबंध गोवा विद्यापीठाला सादर होत असताना आनंद, समाधान, तृप्ती, कृतज्ञता आदी असंख्य भावनांचे वलय माझ्याभोवती तरळत आहेत. या संशोधनासाठी मला माझ्या कुटुंबाचं सहकार्य, प्रोत्साहन व चांगला पाठिंबा मिळाला त्यामुळे माझ्या कुटुंबाचीपण मी मनापासून आभारी आहे.

स्थळ

मराठी अध्ययनशाखा

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

दिनांक

१६ एप्रिल २०२४

**प्रस्तावना**

विष्णू सखाराम खांडेकर यांची १९२३ साली 'घर कुणाचे?' ही पहिली कथा प्रसिध्द झाली असली तरी नियमितपणे कथालेखन ते १९२५ पासून करू लागले. खांडेकरांच्या जीवनवादाचे प्रतिबिंब त्यांच्या कथासृष्टीत उमटले. त्यांच्या कथालेखनाचे तीन कालखंड पडतात. १९२५ ते १९३०, १९३१ ते १९४१ आणि पुढे १९४६ ते आयुष्याच्यात अंतापर्यंत. १९२५ ते १९४१ पर्यंत त्यांचे कथालेखन अखंड चालू होते. 'नवमल्लिका' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९२९ साली प्रसिध्द झाला. त्यांच्या या लघुकथालेखनाचे तीन कालखंड पडतात. १९२५ ते १९३० पर्यंतचा कालखंड हा त्यांच्या लघुकथांच्या दृष्टीने उमेदवारीचा कालखंड मानावा लागेल. या कालखंडात त्यांच्या लघुकथांतून हरिभाऊ आपटे यांचा पाल्हाळ व गडकरी - कोल्हटकरांची अद्भुतरम्यता यांचे मिश्रण फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. सामाजिक जीवनातील सुख दुःखे व समस्या वाङ्मयाच्याव्दारे वाचकांसमोर मांडावयाच्या याकडे त्यांचा स्वभावत:च ओढा आहे. त्यामुळे 'कलेकरिता कला' या मताच्या आग्रहामुळे प्रा. ना. सि. फडके यांच्या साहित्यात ज्याप्रमाणे रंजकतेला प्राधान्य देण्यात आले आहे त्याचप्रमाणे 'जीवनकरिता कला' या विशिष्ट मताच्या आग्रहामुळे खांडेकरांच्या साहित्याला सामाजिक वळण मिळाले आहे. १९३० नंतरच्या काळात मात्र खांडेकरांच्या लघुकथालेखनाचे स्वरूप बरेचसे बदलले. या काळातील त्यांच्या कथा तंत्रशुध्दता, अनुभवांची विविधता आणि जिव्हाळा यांनी पुरेपूर नटलेल्या आहेत. आकर्षक सुरूवात, परिणामकारक शेवट व कथानकाची रेखीव बांधणी यांकडे त्यांचे या काळात अधिक लक्ष असल्याचे 'मुके प्रेम', 'फाटका शर्ट', 'देवदूत', 'गार वारा' इत्यादी किती तरी कथांवरून दिसून येते. निवेदनाच्या त्यांच्या पध्दतीत पत्रांचा, डायरीच्या पानांचा अनेकदा उपयोग केला जातो. खांडेकरांच्या कथा विशेष लोकप्रिय झाल्या त्या त्यांतील तंत्रकौशल्यामुळे नव्हेत किंवा रचनाचातुर्यामुळेही नव्हेत; तर त्यांमध्ये आढळणाऱ्या सामाजिक जाणिवेने आणि त्यांतील जीवनदर्शनाने. आर्थिक विषमता हा त्यांच्या पुष्कळच लघुकथांचा विषय झाला आहे. शुध्द व सात्विक विनोदापासून उपहास - उपरोधापर्यंत विनोदाचे अनेक नमुने त्यांच्या कथांतून पहावयास मिळतात. जांभळीची शाळातपासणी ही कथा त्यांच्या अगदी सुरूवातीच्या काळातील विनोदाचा नमुना आहे. 'मार्क्स व फ्रॉईड', 'कढीभात', 'सुपारीचे खांड', 'मिस् कांचन', 'हवालदाराचा सत्याग्रह', 'कवी, शिंपी व राजकारण', 'करूण कथा' अशांसारख्या अनेक कथांतून प्रसंगनिष्ठ वा स्वभावनिष्ठ विनोद व्यक्त झाला आहे. खांडेकरांनी रूपककथा लिहिल्या. खांडेकरांची काव्यात्म वृत्ती, सूचकता व कल्पनाविलास यांचा प्रत्यय आपणाला त्यांच्या रूपककथांतून येतो. 'कलिका' व 'मृगजळातील कळ्या' हे त्यांचे रूपककथासंग्रह तर प्रसिध्द आहेतच; पण निरनिराळ्या कथासंग्रहांतूनसुध्दा त्यांच्या रूपककथा विखुरलेल्या आहेत. 'आरसेमहाल', 'तीन कलावंत', 'पृथ्वी', 'घरटे', आणि 'धरणीकंप' इत्यादी काही रूपककथा वाचल्या तरी चिमुकल्या कथेतून काव्यात्म रीतीने जीवनदर्शन घडविण्याचे व आशय ध्वनित करण्याचे त्यांचे कौशल्य उल्लेखनीय वाटते.

## संशोधन विषयक समस्या

साहित्यामध्ये जीवनवादाचा पुरस्कार करणारे वि. स. खांडेकर जीवनवादी जाणिवा आपल्या कथेतून व्यक्त करतात. त्याचप्रमाणे त्यांच्या कथा वास्तवाचंही चित्रण करताना दिसून येतात. त्यांच्या कथेतून झालेलं वास्तवाचं आकलन तशीच त्यांची जीवनवादी दृष्टी यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

## संशोधनकार्याची उपयुक्तता / आवश्यकता

विष्णू सखाराम खांडेकरांच्या कथासंग्रहांचा आजवर अनेकांनी अभ्यास केला आहे. साहित्यकारांनी त्यांच्या साहित्यकृतीवर भाष्य केले आहे. वि. स. खांडेकरांच्या रूपककथांचा अभ्यास झाला आहे. त्यांच्या कथासंग्रहांचा आजवर इतका सखोल अभ्यास झाला नाही. या संशोधनाची आवश्यकता अशासाठी आहे कारण वि. स. खांडेकरांनी जे विविध विषय हाताळले, तत्कालीन समस्या मांडल्या, आपल्या प्रत्येक कथेमधून काहीतरी बोध देण्याचा प्रयत्न केला त्यांचे विचार आजच्या नव्या पिढीपर्यंत पोहोचायला हवेत आणि त्यांच्या या विचारातून भावी पिढीला कथालेखनासाठी प्रेरणा, स्फूर्ती मिळायला हवी म्हणून या संशोधनाची आवश्यकता आहे.

## संशोधनकार्यामागची उद्दिष्टे

१. लेखकाच्या जीवनवादी दृष्टीचा अभ्यास करणे.

२. खांडेकर यांच्या कथासंग्रहामधील वास्तवाचा अभ्यास करणे.

३. साहित्यकृतीवर झालेल्या तत्कालीन सामाजिक स्थितीचा शोध घेणे.

४. कथासंग्रहात आढळणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांच्या समस्येचे विवेचन करणे.

## संशोधनविषयक साहित्याचा आढावा / मागोवा

मराठी कथा प्रवृत्ती आणि प्रवाह या पुस्तकात प्रा. रा. गो. चवरे वि. स. खांडेकरांच्या कथालेखनावर भाष्य करताना म्हणतात खांडेकरांच्या जीवनवादाचे प्रतिबिंब त्यांच्या कथासृष्टीत उमटले. कोल्हटकरांच्या विनोदप्रवणतेचे व गडकर्यांच्या डौलदार अलंकारिक भाषाशैलीचे त्यांना आकर्षण होते. त्यामुळे त्यांच्या कथालेखनात कृत्रिम कोट्या, अलंकारप्राचुर्य, भावनाविवशता यांच्या जोडीलाच हरिभाऊ आपट्यांचा पाल्हाळही काही प्रमाणात आला. १९४७ ते १९६४ हा खांडेकरांच्या कथालेखनाचा तिसरा टप्पा ठरला. नव्या अध: पतित जीवनमूल्ये आणि समाजमूल्ये ढासळलेल्या समाजाचे चित्रण करीत त्यावर आपले भाष्य या काळातील कथालेखनात खांडेकरांनी प्रामुख्याने आविष्कृत केले. सांजवात, हस्ताचा पाऊस, प्रितीचा शोध, प्रसाद, मुरली, उ:शाप, ढगाआडचं चांदणं हे त्यांचे कथासंग्रह या काळात प्रसिध्द झाले. या काळातील त्यांच्या कथा वैशिष्ट्यांचे वर्णन करताना प्रा. म. ना. अदवंत म्हणतात सामाजिक जीवनातील विलक्षण परिवर्तनामुळे खांडेकरांच्या मनात जी वैचारिक वादळे निर्माण होऊ लागली त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कथांत अधिकांशाने पडले. या वैचारिक वादळांना अग्रस्थान मिळाले आणि ती व्यक्त करण्यासाठी कथा निर्माण होऊ लागली. त्यामुळे तत्वचिंतक खांडेकरच आपणाला या कथामधून प्रामुख्याने दिसू लागले. आशयगर्भता व आपल्या काळातील समाजातील स्थिती गती हाच खांडेकरांच्या चिंतनाचा तसेच कथालेखनाचा प्रमुख विषय बनला. 'आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास भाग दुसरा' या पुस्तकात अ. ना. देशपांडे वि. स. खांडेकरांनी लिहिलेल्या रूपककथांवर भाष्य करताना ते म्हणतात रूपककथा हा कथाप्रकार बराचसा उपेक्षित राहिलेला आहे. तो जिवंत ठेवण्याच्या कर्तुत्वाचा मोठा वाटा वि. स. खांडेकरांचा आहे. १९३१ पासून त्यांचे रूपकथालेखन सुरु आहे. 'कलिका' या आपल्या रूपककथासंग्रहाला जोडलेल्या दिग्दर्शनांत कल्पकता, सूचकता, मार्मिकता व प्रतिभेची विशालता हे गुण रूपककथेंत असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले आहे. साहित्याचा स्व-भाव या पुस्तकात खांडेकरांच्या साहित्यात वाङमयनिष्ठा आणि खांडेकरकालीन विशिष्ट संस्कृतीनिष्ठा यांचा मेळ कसा बसला आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न प्रा. रा. ग. जाधव यांनी केलेला आहे.

## गृहितकांची मांडणी

१) वि. स. खांडेकर यांच्या कथासंग्रहांमधून जीवनवादी दृष्टी दिसून येते.

२) वि. स. खांडेकर यांच्या कथासंग्रहांमधून वास्तवाचं दर्शन घडतं.

३) वि. स. खांडेकर यांच्या साहित्यकृतीतून तत्कालीन सामाजिक स्थितीचं दर्शन घडतं.

४) वि. स. खांडेकर यांच्या कथासंग्रहात मध्यमवर्गीय लोकांच्या समस्या आढळून येतात.

## संशोधन पध्दती

### वर्णनात्मक अभ्यासपध्दती

वि. स. खांडेकरांची कथा आशयाच्या दृष्टीने कशाप्रकारे विलोभनीय ठरली, त्यांच्या कथेत ध्येयवाद आहे, गरीबांविषयी वाटणारा कळवळा आहे, अन्यायाची आणि सामाजिक विषमतेची चीड आहे. मध्यमवर्गीय समाजाच्या संसाराचे चित्रण, विशिष्ट ध्येयासाठी जीवनसर्वस्व वाहणाऱ्या व्यक्तींचे चित्रण त्यांच्या कथामधून प्रभावीपणे चित्रित झाले आहे, त्यांच्या कथामधून जीवनवादी जाणीवा व्यक्त झाल्या आहेत तर हे सगळं समजून घेण्यासाठी वर्णनात्मक अभ्यासपध्दती वापरली जाईल.

**प्रकरणांची मांडणी**

' वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास ' या विषयावर संशोधनपर प्रबंधिकालेखन करत असताना सदर विषयाची मांडणी खालीलप्रमाणे एकूण पाच प्रकरणाद्वारे केलेली आहे.

| |
|---|
| प्रकरण १ : लघुकथा : संकल्पना व स्वरूप, इतिहास |
| प्रकरण २ : वि. स. खांडेकरांच्या कथेमधून दिसून येणारी जीवनवादी दृष्टी |
| प्रकरण ३ : वि. स. खांडेकरांच्या कथालेखनामधून दिसून येणारा वास्तववाद |
| प्रकरण ४ : वि. स. खांडेकरांच्या कथांसंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या<br>४.१ : उच्च मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या<br>४.२ : विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्या<br>४.३ : मजुर कामगारांच्या सामाजिक समस्या |
| प्रकरण ५ : समारोप<br>५.१ : निष्कर्ष<br>५.२ : संदर्भ |

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

विष्णू सखाराम खांडेकरांनी विपुल प्रमाणात कथालेखन केलं आहे. एकूण २७ कथासंग्रह त्यांनी लिहिले. जसे की नवमल्लिका, दत्तक आणि इतर गोष्टी, जीवनकला, ऊन - पाऊस, दवबिंदू, विद्युत् - प्रकाश, नवचंद्रिका, अबोली, सूर्यकमळे, पूजन, समाधीवरील फुले, पहिली लाट, फुले आणि दगड, घरट्याबाहेर, नवा प्रात: काळ, कल्चर्ड मोती, पहिल्या वहिल्या, स्त्री आणि पुरुष, अश्रु आणि हास्य, हस्ताचा पाऊस, सांजवात, प्रीतीचा शोध, प्रसाद, मुरली, उ:शाप,

ढगाआडचे चांदणे. एकूण १५ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. तसेच १० लघुनिबंधसंग्रह आणि ६ रूपककथासंग्रह त्यांनी लिहिले. तशीच दोन आत्मकथने, एक नाटक आणि १४ समीक्षाग्रंथ त्यांनी लिहिले. विष्णू सखाराम खांडेकरांच्या एकूण २७ कथासंग्रहांपैकी मी माझ्या प्रबंधलेखनासाठी निवडक ६ कथासंग्रह निवडले आहेत.

१) फुले आणि दगड

२) अश्रु आणि हास्य

३) दवबिंदू

४) सूर्यकमळे

५) भाऊबीज

६) वनदेवता

प्रकरण २

# वि. स. खांडेकरांच्या कथेमधून दिसून येणारी जीवनवादी दृष्टी

## **२.१ प्रस्तावना**

माणसाची मूलभूत प्रेरणा आहे जगावे व मनासारखे जगावे याची जाणीव करून त्याच्या परिपूर्तीचा मार्ग सांगणारा विचार म्हणजे जीवनवाद. जीवनवाद हे माझे दुसरे प्रकरण आहे. या प्रकरणात मी प्रसाद, कोकिळा, मोत्याचे पीक, घोडचूक, मुकटा आणि फॅन्सी पातळ, चकोर व चातक, परिस, पोकळी, नीच कोण ?, अजून येतो वास फुलांना, देवता, एक तळे, वैफल्य, कवी आणि मुंगी, हत्ती आणि मुंगी, अहंकार इत्यादी कथांचा जीवनवादी दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

वि. स. खांडेकरांच्या ‘प्रसाद’ या कथासंग्रहात ‘प्रसाद’ ही कथा आली आहे. प्रसाद या कथेत आत्मारामबापू, प्रभाकर आणि भास्कर ही पात्रे आली आहेत. भास्करचे वडील तो पाच वर्षांचा असतानाच वारतात. वडील वारल्यानंतर पुढील शिक्षण कसे घ्यायचे हा भास्करसमोर मोठा प्रश्न असतो. जीवनात आलेल्या या कठीण प्रसंगात आत्मारामबापू त्याला मदतीचा हात पुढे करतात. आत्मारामबापूंजवळ भास्कर आपल्या चार इंग्रजी इयत्ता पूर्ण करतो. आत्मारामबापू भास्करला पुढे शिकायला पाठवायचे ठरवतात. भास्कर तालुक्याच्या गावी शिकायला जातो. तिथे तो आपलं बी.एचं शिक्षण पूर्ण करतो व पुढे जाऊन उपमंत्री होतो. शिक्षण घेऊन पूर्ण झाल्यावर भास्करची आत्मारामबापूंशी एकदाही गाठ पडलेली नसते. असेच एकदा त्याची गाठ आत्मारामबापूंशी होते. ते त्याला आशीर्वाद देत म्हणतात की पोरा दीर्घायुषी हो. तू जसा शिकून स्वत: च्या पायावर उभा आहेस. तसंच इथल्या गोरगरिबांना, गरजवंतांना तुझ्याने होईल तेवढी मदत कर. माणसं फार गांजून गेली आहेत बघ. वि. स. खांडेकरांच्या ‘सूर्यकमळे’ या कथासंग्रहात ‘कोकिळा’ ही एक कथा आली आहे. ही कथा मानवी जीवनावर भाष्य करताना दिसून येते. ‘कोकिळा’ या कथेत कोकिळेला वाटतं की आम्रवृक्षाला मोहर आपल्या गोड गळयामुळेच येतो; वर्षाऋतुचं आगमनसुध्दा आपल्या गोड गळयानेच होतं. ती आम्रवृक्षाला म्हणाली, ‘ मी वठलेल्या झाडावर बसले, तर तोसुध्दा मोहरुन जाईल ! ’ ती वसंताला म्हणाली, ‘ मी वाळवंटात गाऊ लागले, तर तिथंसुध्दा नंदनवन निर्माण होईल ! ’ ती उषेला म्हणाली, ‘ मी संध्याकाळी नुसते कुहू...कुहू केले, तर मावळलेला सूर्य पुन्हा परत येईल ! ‘ ती वल्लभ - वल्लभांना म्हणाली, ‘ मी जर दूर देशी गेले, तर तुमचे प्रेमही माझ्याबरोबर उडून जाईल. ’ आपल्या गोड गळयाचा तिला इतका अभिमान होता की ती या अभिमानाने अंध होऊन गेली होती. कोकिळा पूर्वीप्रमाणे गाण्याचा प्रयत्न करु लागली; पण तिच्या कंठातून सूरच बाहेर पडेनात. शेवटी तिला आपल्या या अंध अभिमानाची जाणीव झाली व ती वसंताला आळवू लागली.

‘ लवकर ये, माझ्या जीवाच्या राजा, लवकर ये. ’ ‘कोकिळा’ या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने जीवनात स्वत: जवळ असलेल्या कौशल्याचा अभिमान बाळगू नये. अशाप्रकारे स्वत: वर असलेल्या अंध अभिमानाने कोकिळेची कशाप्रकारे फजिती होते हे या कथेतून खांडेकरांनी स्पष्टपणे मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘कलिका’ या कथासंग्रहात ‘मोत्याचे पीक’ ही कथा आली आहे. ‘मोत्याचे पीक’ ही वि. स. खांडेकरांची रूपककथा आहे. पाणबुड्यांनी वरूणदेवतेची प्रार्थना केली, ‘ देवा, यंदा नुसत्या स्वातीचा पाऊस पाड. खूप खूप मोती पिकू देत. गोरगरिबांच्या मुलांच्या कानांत डूल झुलू देत. त्यांच्या बायकांच्या हातांत मोत्यांची काकणे फुलू देत. मंदिरांच्या दारादारावर मोत्यांचे पडदे हलू देत. ’ पावसाळा आला.

लोक मृगाची अत्यंत उत्कंठेने वाट पाहत होते. मघा आल्या लोकांच्या डोळ्यांत प्राण उभे राहिले. मघा आल्या तशाच गेल्या. मघात पाऊस पडलाच नाही. मानवी मन हे आशावादी असतं. मनाला वाटलं मृगात नाही पडला, मघात नाही पडला पण हस्तात पाऊस पडेलच पडेल. स्वाती नक्षत्र आलं, स्वाती नक्षत्रात मात्रं उभ्या वर्षाचा भरपूर पाऊस कोसळला. स्वाती नक्षत्रात जो उभ्या वर्षाचा भरपूर पाऊस कोसळला त्याने पाणबुडे मात्र खूश झाले. पाणबुडे पाण्याबरोबर नाचत आले. इतके मोत्यांचे शिंपले त्यांनी उभ्या जन्मात पाहिले नव्हते. श्रमाने आणि आनंदाने ते झोपी गेले. मोती काढण्याचे काम बरोबर आलेले लोक करीतच होते. ते जागे होऊन पाहतात ते समोरुन उंच उंच राशी पडलेल्या ! एकाला वाटले, भाताची रास असेल ही ! दुसऱ्याला वाटले जोंधळ्याची रास असेल ती ! पाणबुड्यांनी आपल्या डोळ्यांवरून हात फिरविला. कुणीही स्वप्नात नव्हता. त्यांच्यासमोर पसरलेल्या साऱ्या राशी मोत्यांच्या होत्या. त्या राशी पाहून त्यांची तहानभूक हरपून गेली. शेतकरी मात्र रडत होते, व्यापारी कुढत होते कारण त्यांना हवा असलेला मृगाचा पाऊस पडला नाही. स्वातीच्या पावसानं फक्त मोती पिकतात. ज्वारी, गहू, तांदूळ आणि बाजरी हे जे अन्न लागतं खायला ते मिळत नाही. थोड्या वेळाने जो तो तळमळू लागला. प्रत्येकाच्या पोटात कावळे ओरडू लागले होते. बरोबर आणलेली शिदोरी केव्हाच संपून गेली होती. मोत्यांनी भरलेले हारे डोक्यावर घेऊन पाणबुडे लोकवस्तीच्या दिशेने धाऊ लागले. दुरुन एक झोपडी दिसली त्यांना. आता आपल्याला खायला मिळणार म्हणून जो तो जोराने चालू लागला. आपल्या गाठोड्यातले मूठभर मोती हातात घेऊन तो पाणबुडयांचा पुढारी पुढे झाला. पण त्या बाईने पाणबुड्यांना सांगितले की चला चालते व्हा इथनं ! एकच भाकरी आहे माझ्या घरात. माझ्या पोरांना हवी ती ! पाणबुडे तिथून निघाले. ते गावात आले. घरोघर फिरले. पण मूठ मूठभर मोती घेऊनसुध्दा भाकरी देणारा मनुष्य त्यांना भेटला नाही. झोपडीत, घरात, मंदिरात सुखाच्या सर्व वस्तू होत्या. फक्त एकच गोष्ट नव्हती - अन्न ! चालून चालून पाणबुड्यांचे पाय गळून गेले होते. डोक्यावरल्या मोत्यांचे ओझेही त्यांना आता असह्य झाले होते. एका देवळात देवापुढे हात जोडून बसलेल्या संन्याशाला त्यांनी विचारले, ‘ जगातलं सारं अन्न गेलं कुठं ? ’ त्यावर संन्याशी उत्तरला, अन्न आलंच नाही, मग जाणार कुठं ? येणार कुठून ? मृगाचा पाऊस नाही, मघाचा पाऊस नाही, हस्ताचा पाऊस नाही. फक्त स्वातीचा पाऊस पडला. त्या पावसाचा पोटाला काय उपयोग ? त्यानं फक्त मोती पिकतात. संन्याशाच्या या बोलण्याने आता पाणबुड्यांना कळून चुकले की आपण गोळा केलेल्या मोत्यांना अन्नापुढे काहीच किंमत नाही. कारण माणसाला जगण्यासाठी अन्न लागतं. सारे पाणबुडे वेड्यासारखे समुद्राकडे धावत गेले. ते सारे मोत्यांचे हारे त्यांनी समुद्रात ओतले. एकही मोती त्यांनी बाहेर ठेवला नाही. पाणबुड्यांनी हात जोडून वरूणदेवतेची प्रार्थना केली,

‘ देवा, मृगाचा पाऊस पडू दे, मघाचा पाऊस पडू दे, हस्ताचा पाऊस पडू दे. स्वातीचा पाऊस पडला नाही तरी चालेल. अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. ‘मोत्याचे पीक’ या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला जगण्यासाठी मोत्यांहूनही अन्न महत्वाचं आहे. कारण अन्नावाचून माणूस जगूच शकत नाही. अशाप्रकारे अन्नाचं महत्त्व ते या कथेतून अधोरेखित करतात. वि. स. खांडेकर यांच्या ‘कलिका’ या कथासंग्रहात ‘परिस’ ही कथा आली आहे. या कथेची सुरुवात अशी होते की एके दिवशी रस्त्याने काही कैदी चालले होते. बाहेर कडक ऊन पडलं होतं. विसाव्याकरिता ते कैदी या दगडाच्या अवतीभोवती असलेल्या झाडाखाली बसले. एक कैदी गाऊही लागला. त्याचे गाणे ऐकून त्याच्याबरोबर जे इतर कैदी होते तेही आनंदाने डोलू लागले. त्यांच्याबरोबर जो शिपाई होता तोही आपण कैद्यांवर पहारा करीत आहोत हे विसरून गेला. प्रेमगीत होते ते. त्या गाण्यातील प्रियकर म्हणत होता, “ सखे, मी पूर्वी लोखंडासारखा होतो; पण तुझा स्पर्श होताच माझे जीवन सुवर्णमय होऊन गेले. ” मोठ्या रंगात येऊन गाणे ऐकणाऱ्या एका कैद्याने आपल्या हातातले खोरे सहज उचलले आणि हळूच जमिनीवर आपटले. खणकन् आवाज झाला. लोखंडाचे सोने करणारा तो दगड मिळविण्याकरिता जो तो धडपड करू लागला. या सगळया कैद्यांना तर या दगडाचा मोह पडला. एकमेकांच्या डोक्यांत खोरी घालून सारे कैदी मरणाची वाट पाहत जमिनीवर पडले. शिपायाने तो दगड हळूच उचलला आणि आपल्या खिशात घातला. तो परिस शिपायाने आपल्या बायकोजवळ दिला. शिपायाच्या बायकोला तो दगड विळीला लावून पाहण्याचा मोह आवरला नाही. सोन्याची विळी घरात ठेवून काय करायची ? शिपाई ती सराफकट्टयावर घेऊन गेला. प्रत्येक सराफाने त्या सोन्याचा कस पाहिला. अगदी बावनकशी सोने होते ते ! पण प्रत्येकाला एकच कोडे पडले. कुबेराच्या मंदिरातसुध्दा सोन्याची विळी नसेल ! मग या य:कश्चित् शिपायापाशी ती कुठून आली. अशाप्रकारे तो दगड शिपायाकडून कोतवालाकडे जातो. कोतवालाच्या घरी त्याचे दोघे भाऊ होते. पहिल्या भावाने परिस हातात घेऊन तो प्रत्येक लोखंडाच्या वस्तूला लावायला सुरुवात केली. खिळे सोनेरी झाले. गज सोनेरी बनले. कुलुपे सोनेरी झाली. अशाप्रकारे कुणालाही त्या परिसाचा मोह आवरला नाही. या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला कधीही कोणत्याही वस्तुचा मोह असता कामा नये. या मोहामुळे माणसाच्या मनात मत्सर, राग इत्यादी भावना उत्पन्न होतात. आणि मग माणूस रागाच्या भरात चुकीच्या निर्णयाकडे पोचतो. वि. स. खांडेकर यांच्या ‘मृगजळातील कळया’ या कथासंग्रहात ‘घोडचूक’ ही कथा आली आहे. या कथेची सुरुवात अशी होते की सूर्याकडे पाहून घड्याळयाला नेहमी हसू येई. रूपाचा प्रश्न आला की घड्याळ स्वत:च्या सौंदर्याकडे अभिमानाने पाही. कारण घड्याळ सूर्याला

तुच्छ लेखीत असे. अभिमानाच्या भरात सूर्याला मुरडून घड्याळ उद्गार काढी, आहे झालं जडभरत आणि मुखस्तंभ ! कसं चोवीस तास सुरु असतं माझं गाणं. घड्याळ स्वत:ची प्रशंसा करताना म्हणे लहान मूर्ती पण थोर कीर्ती ! भर मध्यरात्री वेळ विचारा - क्षणात सांगेन - बारा वाजून पाच मिनिटं आणि पंधरा सेकंद झाले आहेत. खरं पाहिलं तर आकाशातली सूर्याची जागा माझीच नाही का ? असं घड्याळ स्वत: शीच अभिमानाने म्हणे. एके दिवशी रात्री बारा वाजता घड्याळ एकदम बंद पडले. अखंड नाचणाऱ्या सोनेरी काट्याची हालचाल क्षणात थांबली. प्रयत्नांची पराकाष्ठा झाली पण घड्याळ काही केल्या चालू होईना. दुसरे दिवशी सकाळी सूर्याचे किरण नेहमीप्रमाणे घरात आले. ते घड्याळावरही पडले. त्यात बारा वाजलेले स्पष्टपणे दिसत होते. 'घोडचूक' या कथेतून वि. स. खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने जीवनात स्वत:चा जास्त अभिमान बाळगू नये. जास्त अभिमान बाळगला तर कशाप्रकारे फजिती होते हे या कथेतून सांगण्याचा प्रयत्न खांडेकरांनी केला आहे. त्याचप्रमाणे आपण कितीही मोठे असलो तरी इतरांना तुच्छ लेखू नये हेही या कथेतून खांडेकरांनी सांगितले आहे. वि. स. खांडेकर यांच्या 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहात 'चकोर व चातक' ही कथा आली आहे. या कथेत चकोर व चातक हे दोन पक्षी आले आहेत. चातक ओरडतच होता, " ये, ये, मेघमाले, ये! " चकोर आक्रोशतच होता, " ये, ये, चंद्रिके, ये! " कंठ सुकेपर्यंत ते ओरडले; पण जलबिंदू आणि चांदणे ही दोन्ही आकाशातच राहिली. त्या दोन्ही पक्ष्यांना आता एकमेकांचा भरपूर राग आला. हा हा म्हणता ते एकमेकांवर तुटून पडले. लेखकाने पाहिले तर दोन्ही पक्षी जमिनीवर मरून पडले होते. चातक व चकोर या दोन्ही पक्ष्यांना एकमेकांशी बोलण्याच्या भरात त्यांना एकमेकांचा राग अनावर होतो. या रागाच्या भरात हे दोन्ही पक्षी आपला प्राण गमावून बसतात. या दोन्ही पक्ष्यांनी स्वत: च्या मनावर ताबा ठेवला असता तर या दोन्ही पक्ष्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते. या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला जीवनात काही मिळवायचं असेल तर त्याने संयम बाळगला पाहिजे. या दोन्ही पक्ष्यांनी जर एकमेकांशी न भांडता संयम बाळगला असता तर त्यांना हव्या असलेल्या गोष्टी सहज मिळाल्या असत्या. वि. स. खांडेकर यांच्या 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहात 'देवता' ही कथा आली आहे. या कथेची सुरूवात अशी होते राजाने नवे देवालय बांधले. त्या मंदिरात संगमरवरी दगडाची सुंदर मूर्ती विराजमान झाली. मूर्तीजवळच भव्य नंदादीप ठेवण्यात आला. नंदादीपाची समई सोन्याची होती. ती चोरीला जाऊ नये, म्हणून देवाच्या दारात पहारा बसविण्यात आला. वेळी - अवेळी राजा देवदर्शनाला येऊ लागला. एके दिवशी त्याने सहज एकदा नंदादीपाकडे निरखून पाहिले. सोन्याची समई चमकत होती. समईत पाच शुभ्र ज्योती पेटत होत्या. पण - पण एका ज्योतीजवळ

कसलीतरी एक भिकारडी काडी पडली होती. राजाच्या मनात आले, या दरिद्री पुजाऱ्याला सौंदर्यदृष्टीच नाही. या सर्व वैभवशाली सरंजामात ही काडी कशाला हवी ? राजाने काडी उचलून बाहेर फेकून दिली. महालात परत जाताच राजाने पुजारयाला निरोप पाठविला. मंदिरातल्या सुंदर नंदादीपात एवढीशीसुध्दा काडी ठेवायची नाही. तिथे पुन्हा काडी आढळली, तर पुजाऱ्याला वधस्तंभावर लटकविण्यात येईल. राजाने पाठविलेला निरोप ऐकताच पुजारी धावत धावत आला. पण महाराज भोजन करीत होते. आणखी दोन घटकांनी पुजारी पुन्हा आला. यावेळी त्याचा चेहरा अगदी काळवंडून गेला होता. " काहीही करून महाराजांची नि माझी गाठ घालून द्या " म्हणून त्याने महालावरच्या अधिकाऱ्याचे पाय धरले. बिचारा पुजारी पुन्हा दोन घटकांनी धावत आला. तो मोठ्याने ओरडला, महाराज, महाराज. पण महाराज एका नव्या नर्तिकेचे नृत्य पाहण्यात तल्लीन झाले होते. नृत्य संपल्यावर राजा देवदर्शनाला गेला. तो गाभाऱ्याच्या दारात जाऊन पाहतो, तो आत काळोख पसरला होता. राजाला पुजाऱ्याचा राग आला. देवाची संगमरवरी मूर्ती, सोन्याची समई, सारे सारे अंधारात बुडून गेले होते. पुजाऱ्याला वधस्तंभावर लटकविण्याची शिक्षा तो सांगणार ; इतक्यात त्या अंधारातून गंभीर ध्वनी आला. " राजा, खरा अपराधी तू आहेस, पुजारी नाही. " देवाच्या मूर्तीला वाचा फुटली काय, हे राजाला कळेना. तो भयभीत होऊन ऐकू लागला. " राजा, नंदादीपातली क्षुद्र काडी पाहून आपल्या मंदिराच्या सौंदर्यात वैगुण्य आलं, असं तुला वाटलं. नंदादीपात काडी ठेवायची नाही, अशी आज्ञा तू पुजाऱ्याला केलीस; पण या मंदिराचं, माझ्या मूर्तीचं आणि या सोन्याच्या समईचं सारं सौंदर्य त्या एका काडीवर अवलंबून होतं, याची तुला कल्पनाही आली नाही. " बाहेर टाकून दिलेली काडी राजाने आदरपूर्वक मंदिरात आणली. या कथेतील जो राजा आहे त्याने नवे देवालय बांधले. त्या मंदिरात संगमरवरी दगडाची देवाची सुंदर मूर्ती होती. वेळी - अवेळी राजा देवदर्शनाला येऊ लागला. एके दिवशी त्याने सहज एकदा नंदादीपाकडे निरखून पाहिले. समईत पाच शुभ्र ज्योती पेटत होत्या. पण एका ज्योतीजवळ कसलीतरी एक भिकारडी काडी पडली होती. या सर्व वैभवशाली सरंजामात ही काडी कशाला हवी ? असे राजाला वाटले पण देवाने जेव्हा राजाला सांगितले, " राजा, नंदादीपातली क्षुद्र काडी पाहून आपल्या मंदिराच्या सौंदर्यात वैगुण्य आलं, असं तुला वाटलं. पण या मंदिराचं, माझ्या मूर्तीचं आणि या सोन्याच्या समईचं सारं सौंदर्य त्या एका काडीवर अवलंबून आहे असं जेव्हा देवाने राजाला सांगितलं तेव्हा राजाला आपली स्वत:ची चूक लक्षात आली. 'देवता' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की राजाने जी काडी बाहेर फेकून दिली होती त्या एका काडीवर खरंतर त्या मंदिराचं, देवाच्या मूर्तीचं सारं सौंदर्य अवलंबून होतं. त्यादिवशी त्या काडीचं महत्त्व राजाच्या लक्षात आलं. वि. स. खांडेकर यांच्या 'मृगजळातील कळ्या' या

कथासंग्रहात ‘एक तळे’ ही कथा आली आहे. या कथेची सुरुवात अशी होते की त्या गावातली सर्व भाविक माणसे आपली पूजा यथासांग व्हावी म्हणून त्या तळयाच्या काठी नियमाने येत असत. बहुतेक लोक भराभरा त्या तळयातली हवी तेवढी कमळे खुडत. दुपारी शेजारच्या शिवालयातली पूजा सुरू झाली, अष्टोत्तर कमळे वाहून भक्तगणाने वाजविलेल्या घंटेचा नाद कानावर पडू लागला की, त्या तळयाला आपल्या आयुष्याचे सार्थक झाले असे वाटे. एके दिवशी ते या आनंदात मग्न असताना एक बगळा तिथे आला. तळयाकडे पाहून त्याने नाक मुरडले. तळे त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागले. बगळा वेडावाकडा चेहरा करून म्हणाला, “ छी: ! छी: ! काय घाण पाणी आहे हे ! आपण तर याला चोच लावायलासुध्दा तयार नाही बुवा ! ’’ कमळे खुडून नेणाऱ्या माणसांच्या पायांनी आपले पाणी गढूळ झाले आहे हे तळयाच्या लक्षात आले. बगळा गंभीरपणे उद्गारला, “ मी शेकडो नद्या पाहिल्या आहेत, समुद्रसुध्दा पाहिला आहे. पण इतकं घाण पाणी मात्र कुठंच पाहिलं नाही ! गंगेचं पाणी कसं स्फटिकासारखं शुभ्र आहे ! आणि हे पाणी. ” बगळा तळयापासून दूर दूर जाऊ लागला. त्याला हाक मारून तळे म्हणाले, “ आज माझी चूक मला कळली. चार दिवस धीर धर. चार दिवसांत माझं पाणी गंगेइतकं शुभ्र होतं की नाही हे पाहा ! ” कमळे न्यायला येणाऱ्या प्रत्येक मनुष्यापाशी तळयाने आपला चिखल उपसून टाकण्याचा हट्ट धरला. वर्षानुवर्षे आपल्या पूजेला तळयाने दिलेली कमळे लक्षात घेऊन सारी भाविक मंडळी गाळ उपसू लागली. तळयात चिखल अजिबात उरला नाही. आपले पाणी गंगेइतके स्वच्छ झाले या आनंदात तळे दंग झाले. पण लवकरच तळयात जी कमळे फुलायची त्या कमळांच्या सर्व वेली सुकून गेल्या. तळयात एकही कमळ फुलेना. कमळांविना तळयाला आपले जीवन अगदी रूक्ष, नीरस वाटू लागले. या कथेतील जो बगळा आहे त्याने आपला स्वार्थ साधून घेतला. त्या तळयाचे पाणी स्वच्छ झाल्यामुळे बगळयाला खायला भरपूर मासे मिळाले. मात्र तळयात चिखल न उरल्यामुळे एकही कमळ फुलेना त्यामुळे तळयाला आपले जीवन नीरस वाटू लागले. ‘एक तळे’ या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने आपल्या जीवनात स्वार्थी असता कामा नये. किंवा दुसऱ्याच्या सांगण्यावरून स्वत:मध्ये बदल न करता पहिल्यांदा स्वत:चा विचार करायला हवा कारण दुसऱ्याच्या सांगण्यावरून माणूस अनेकदा स्वत:चा आनंद गमावून बसतो. वि. स. खांडेकर यांच्या ‘अश्रु आणि हास्य’ या कथासंग्रहात ‘मुकटा आणि फॅन्सी पातळ’ ही कथा आली आहे. या कथेतील नायक हा विमा कंपनीचा एजंट असतो. तो दिवाळीच्यानिमित्ताने आपल्या बायकोला म्हणजेच इंदिरेला नवं कोरं पातळ घेऊन येतो. तो आपल्या बायकोला सांगतो की विरूद्ध पक्षानं दुसऱ्या विमा कंपनीची एजन्सी मिळविली होती. मी जे काम अर्ध करून आलो आहे ते ढासळून टाकण्याचा

त्यांचा बेत आहे. उद्या गेलो नाही तर केलेलं काम फुकट जाईल असं तो आपल्या बायकोला सांगतो. पण परत जायला पैसे कुठून आणायचे ? हा नायकासमोर प्रश्न उभा राहतो. हे तो आपल्या बायकोला सांगतो. त्याची बायको त्याने आणलेलं नवं पातळ एका बाईला विकत देते. त्या पातळातून आलेले पैसे ती आपल्या नवऱ्याला देते. या कथेतून खांडेकरांनी नवरा बायकोने आपला संसार चालवत असताना जुळवून घ्यायला हवं हे या कथेतून त्यांनी मांडलं आहे. वि. स. खांडेकर यांच्या 'सरत्या सरी' या कथासंग्रहात 'पोकळी' ही कथा आली आहे. माई या कथेतली मुख्य नायिका आहे. माई जेव्हा गावात आली तेव्हा गावात मुलींच्या शिक्षणाची चांगलीशी सोय नव्हती. माई शिक्षिका होती. अविवाहित राहून आपलं सारं आयुष्य तिने या शाळेला वाहिलं होतं. सुमित्रा ही तिची विद्यार्थीनी होती. तिची आई अर्धांगवायूने वारली होती. तिचा बाप दारूडा होता. अशावेळी तिच्यासमोर शिक्षण कसं मिळवायचं ? हा प्रश्न उभा राहतो. अशा संकटाच्यावेळी माई तिला मदतीचा हात पुढे करते. ती दहावीपर्यंतचं शिक्षण माईजवळ पूर्ण करते. पुढे ती उच्च शिक्षणासाठी परदेशात जाते. परदेशात जाऊन ती डॉक्टरीण होते. डॉक्टरीण होऊन ती जेव्हा भारतात परत येते तेव्हा तिचा सत्कार केला जातो. माईने आपलं सारं आयुष्य अविवाहित राहून शिक्षकीपेशात घालविलेलं असतं. शेवटी आपल्या एकाकीपणाची तिला जाणीव होते आणि एक प्रकारची पोकळी आपल्या आयुष्यात तिला जाणवते. यावेळी सुमित्रा तिच्याजवळ असते. सुमित्रेला पाहून तिला एकप्रकारचं समाधान वाटतं. आपण आयुष्यभर शिकवलं. त्या शिक्षणाचा आपल्या विद्यार्थ्यांना फायदा झाला. आपले विद्यार्थी शिकून चांगल्या पदावर पोचलेत हे बघून तिला आपलं आयुष्य सार्थकी झालं याचं समाधान वाटलं. वि. स. खांडेकर यांच्या 'भाऊबीज' या कथासंग्रहात 'नीच कोण ?' ही कथा आली आहे. या कथेमध्ये रावसाहेब आणि बाळ ही दोन पात्रे आली आहेत. हा जो बाळ असतो त्याची आई तापाने फणफणत असते. ती बरी व्हावी म्हणून तो शाळा चुकवून मोलमजुरी करून आठ आणे कमावतो. त्याला आपल्या आईसाठी पावशेर दूध आणि तांदूळ हवे असतात. सरकारी दुकानात स्वस्तात तांदूळ विकत घ्यायचे असं त्याने स्वत:शी ठरवलेलं असतं. तो तांदूळ विकत घेण्यासाठी जेव्हा रावसाहेब यांच्या दुकानात जातो तेव्हा ते त्याला आपल्या एका मित्राकडे जाऊन चंद्रहार आणायला सांगतात. रावसाहेब हा सावकार असतो. या रावसाहेबाने आपल्या बायकोला म्हणजेच कृष्णाजीला चंद्रहार केव्हाच आणून दिलेला असतो. पण तरीही चंद्रहार चोरल्याचा खोटा आळ हा रावसाहेब त्या बाळावर घेतो. त्याला पोलीस अटक करून घेऊन जातात. तो आपण चंद्रहार चोरला नाही असं पोलीसांना स्पष्टपणे सांगतो. 'नीच कोण?' या कथेमध्ये वि. स. खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की कधीही कुणावर खोटा आरोप करुन दुसऱ्यांना त्रास देऊ नये. दुसऱ्यांना

संकटाच्यावेळी मदत करावी. श्रीमंत असल्याचा अहंकार बाळगू नये. वि. स. खांडेकर यांच्या 'अजून येतो वास फुलांना' या कथासंग्रहात 'अजून येतो वास फुलांना' ही कथा आली आहे. या कथेत सदाशिव सोनटक्के हे पात्र आले आहे. सदाशिव हा एक वृध्द गृहस्थ असतो. असाच एकदा त्याला त्याचा कालेजचा मित्र भेटतो. सदाशिव किती किती वर्षांनी भेटलोय रे आपण ? हे मित्राच्या तोंडून शब्द ऐकताच सदाशिवाचे डोळे पाण्याने डबडबले. त्याचा मित्र त्याच्याशी त्यांच्या कॉलेजच्या गोड आठवणींची उजळणी करत होता. सदाशिवाचे मात्र तिकडे लक्ष नव्हते. सदाशिव आपल्या मित्राला करुण कहाणी सांगू लागला. अरे बाबा, या जगात म्हाताऱ्याइतकं पोरकं दुसरं कोणी नाही. मुलगा, सून, जग कुणी कुणी त्याला धूप घालीत नाही. सदाशिव सोनटक्के पदवीधर होऊन आफ्रिकेत गेला. तिथं त्यानं खोऱ्यानं पैसा ओढला. तो कलकत्याला राहत होता. बंगला, जमीनजुमला, पैसा अडका सारं सारं काही यथास्थित होतं. पण दहा वर्षांपूर्वी त्याची बायको एका अपघातात मरण पावली. थोरल्या मुलीने त्याच्या इच्छेविरूध्द परजातीत लग्न केलं. मुलगा बायकोच्या अगदी मुठीत आहे. म्हातारपणात म्हाताऱ्या व्यक्तीला आपल्या कुटुंबाचा आधार हवा असतो. सदाशिवला मात्र असा आधार मिळत नाही. म्हणून तो दु:खी असतो. म्हातारपण म्हणजे कुतरपण असं तो वैतागानं म्हणे. तो आपल्या मित्राला सांगतो, फार फार वाईट दिवस आले आता. एकेकदा आपल्या मनात येतं असलं हे मरतुकडं जिणं जगण्यापेक्षा जीव दिलेला काय वाईट ? इतका तो सदाशिव आपल्या म्हातारपणाला वैतागला होता. सदाशिवाचे हे बोलणे ऐकून त्याच्या मित्राला वाटतं वार्धक्यात असं मुलुखावेगळं काय आहे ? मनुष्य हा सृष्टीचा एक घटक आहे. मग जन्म, बाल्य, तारूण्य, प्रौढत्व, वार्धक्य या जीवनातल्या ऋतूचक्राबद्दल त्याने तक्रार का करावी ? सहा ऋतूंपैकी वसंताचा फुलोराच माझ्या वाट्याला यावा किंवा मी सदैव शरदाच्या चांदण्यात न्हाऊन निघावं असं मनुष्याला का वाटावं ? म्हातारपणातसुध्दा मनुष्याला आनंदाने जगता आलं पाहिजे. या कथेतून खांडेकरांनी सदाशिव सोनटक्के या एका वृद्ध गृहस्थाची व्यथा मांडली आहे. प्रत्येक माणसाला केव्हा ना केव्हा म्हातारपण येतंच. माणूस जेव्हा तरूण असतो तेव्हा त्याला जगण्यात रस असतो पण तो जेव्हा म्हातारा होतो तेव्हा त्याच्या जगण्यातला हा रस नाहीसा होतो. हीच परिस्थिती या कथेतल्या सदाशिव सोनटक्केची झाली आहे. सदाशिव आपल्या म्हातारपणावर वैतागतो. या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने म्हातारपण आलं म्हणून दु:खी, कष्टी राहण्यापेक्षा, कुडत बसण्यापेक्षा माणूस जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत त्याने आनंदात जगत राहावं. वि. स. खांडेकर यांच्या 'क्षितिजस्पर्श' या कथासंग्रहात 'वैफल्य' ही कथा आली आहे. एकदा सृष्टीचा निर्माता परमेश्वर पृथ्वीवर आला. पहिल्यांदा त्याला एक फुलपाखरू भेटले. त्याने फुलपाखराला प्रश्न केला,

" बेटा, तू सुखी आहेस ना ? '' त्यावर फुलपाखरू तिरसटपणाने उत्तरले, " मी एक दुर्दैवी प्राणी आहे साधुमहाराज. " तेव्हा परमेश्वर वत्सल स्वराने म्हणाला, " देवानं तुला किती सुरेख पंख दिले आहेत. " त्यावर फुलपाखरू उत्तरले, " पण ते गरूडासारखे मोठे कुठं आहेत ? " मग परमेश्वर कोकिळेजवळ येतो. तो तिला विचारतो, " बेटी, तू सुखी आहेस ना ? " कोकिळाही आपल्या जीवनात सुखी नव्हती. कोकिळा परमेश्वराला तावातावाने म्हणाली, देवाइतकं वाईट कुणी नाही या जगात. काळा रंग कशाला दिला मेल्यानं मला ? त्याच्या जवळचे  फुलपाखरांचे सारे रंग काय संपून गेले होते ? कोकिळाही आपल्या जीवनात समाधानी नव्हती. कोकिळेचे हे बोलणे ऐकून परमेश्वर खाली  मान घालून पुढे चालू लागला. गरूड भेटताच त्याने मोठ्या उल्हासयुक्त स्वराने विचारले, " बेटा, तू तरी सुखी आहेस ना ? " त्यावर विचित्र चीत्कार करीत गरूड ओरडला, डोंगराच्या कडेकपारीत राहण्यात कसलं आलंय सुख ? देवानं मला असला वैराण जन्म देण्यापेक्षा चिमणं फुलपाखरू केलं असतं तर बरं झालं असतं असं गरूडाला वाटतं. या कथेतील फुलपाखरू, कोकिळा, आणि गरूड हे आपल्या जीवनात समाधानी नव्हते. 'वैफल्य' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की परमेश्वराने जो आपल्याला जन्म दिला आहे त्यात माणसाने समाधानी असायला हवं. वि. स. खांडेकर यांच्या 'क्षितिजस्पर्श' या कथासंग्रहात 'कवी आणि मुंगी' ही कथा आली आहे. या कथेत एक कवी आला आहे. हा कवी गावाजवळच्या टेकडीच्या पायथ्याशी उभा राहून तो आकाशात लखलखणाऱ्या चांदण्यांकडे पाहत होता. कवीच्या मनात आले, या चांदण्यांचे सौंदर्य टेकडीवरून अधिक चांगले दिसेल. तो टेकडी चढू लागला. इतक्यात त्याच्या डाव्या हाताला कसला तरी बारीक दंश झाला. कवीने निरखून पाहिले. ती एक मुंगी होती. कवी तिला म्हणाला, तुला काय हवंय ते सांग. त्यावर मुंगी म्हणाली, " माझी दुसरी काही इच्छा नाही. तुमच्याबरोबर मीही वर येते. कवी म्हणाला, " कशाला " त्यावर मुंगी म्हणाली, " तुम्ही कशाला जाताय या टेकडीवर ? " कवी तिला म्हणाला, " चांदण्यांचं सौंदर्य डोळे भरून पाहायला. " मुंगी त्याला म्हणाली, " मलाही ते पाहायचं आहे. " मुंगी कवीच्या हाताला घट्ट चिकटून बसली. कवी टेकडीच्या माथ्यावर जाऊन पोहोचला. त्याने अतृप्त नजरेने वरची अगणित नक्षत्रे पाहिली. टेकडीच्या पायथ्याशी ती जशी दिसत होती तशीच आताही ती त्याला दिसली. कवी निराश झाला आणि त्याने आपली दृष्टी खाली वळवली. तो टेकडीच्या पायथ्यापलीकडच्या झाडीत झोपलेल्या गावांकडे पाहू लागला. पाहता पाहता त्याच्या डोळ्यांपुढे चित्रे तरळू लागली. एका दिव्यापाशी एक आई बसली आहे. ती आपल्या चिमुकल्याला काहीतरी म्हणायला शिकवीत आहे. तो म्हणत आहे, " बुध्दी दे रघुनायका. " दुसऱ्या दिव्यापाशी एक तरूण पुरूष बसला आहे. तो आपल्या वृद्ध मातेला पांडवप्रताप वाचून दाखवीत आहे.

तिसऱ्या दिव्यापाशी एक नववधू बसली आहे. ती झरझर मोगरीच्या फुलांची वेणी करीत आहे. पण तिचे लक्ष त्या वेणीत नाही. ते दाराकडे आहे. बाहेर पाऊल वाजल्याचा तिला भास होतो. अशी चित्रामागून चित्रे कवीच्या डोळ्यांपुढून सरकू लागली - वात्सल्याची, सेवेची, शृंगाराची. कवी उद्गारला, " किती वेडा आहे मी ! खरं सौंदर्य या वरच्या चांदण्यांत नाही. ते या खालच्या दिव्यांत आहे. " कवी टेकडी उतरू लागला. इतक्यात त्याच्या डाव्या हाताला दंश झाला. त्याला मुंगीची आठवण झाली. तो तिला म्हणाला, " काय हवंय तुला ? " मुंगी त्याला म्हणाली, " वर चल. आणखी वर चल. " कवी म्हणाला, " कुठं ? " मुंगी म्हणाली, " वर ! आभाळात. " कवी म्हणाला, " कशाला ? " त्यावर मुंगी म्हणाली, " तिथं किती किती साखर पसरलीय बघ ! ती सोडून खाली कुठं चाललाहेस तू ? 'कवी आणि मुंगी' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाची पाहण्याची दृष्टी चांगली असायला हवी. कारण जशी दृष्टी तशी सृष्टी. वि. स. खांडेकर यांच्या 'वनदेवता' या कथासंग्रहात 'हत्ती आणि मुंगी' ही कथा आली आहे. एकदा एक हत्ती आणि एक मुंगी यांची गाठ पडली. हत्ती मुंगीकडे पाहून तुच्छतेने हसला आणि म्हणाला, ' ए प्राण्या, किती क्षुद्र, किती दुर्बळ आहेस तू ! तुला कुणी निर्माण केलं ? ' त्यावर मुंगी उत्तरली, परमेश्वरानं. हत्ती तिला म्हणाला, शक्य नाही. त्यावर मुंगी म्हणाली ते का ? हत्ती तिला म्हणाला, मला निर्माण करणारा परमेश्वर इतका भिकार प्राणी कसा निर्माण करील ? मुंगी मध्येच म्हणाली, ' ए राक्षसा, किती प्रचंड, किती बेढब प्राणी आहेस तू ! तुला कुणी निर्माण केलं ? ' त्यावर हत्ती उत्तरला, परमेश्वरानं. मुंगी त्याला म्हणाली, शक्य नाही. त्यावर हत्ती म्हणाला, ते का ? मुंगी त्याला म्हणाली, मला निर्माण करणारा परमेश्वर असला लठ्ठंभारती प्राणी कसा निर्माण करील. या कथेत आलेले हत्ती आणि मुंगी हे दोघेही एकमेकांना तुच्छ लेखतात. 'हत्ती आणि मुंगी' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने आपल्या जीवनात कधीही कोणाला तुच्छ लेखू नये. वि. स. खांडेकर यांच्या 'वनदेवता' या कथासंग्रहात 'अहंकार' ही कथा आली आहे. या कथेची सुरुवात अशी होते एक मुंगी साखरेचा कण शोधीत होती. फिरता फिरता तिला एक वाटाण्याचा दाणा दिसला. ती भीत भीत त्याच्याजवळ गेली आणि स्नेहपूर्ण स्वराने म्हणाली, ' कोण आहेस रे, तू ? ' त्यावर वाटाण्याचा दाणा म्हणाला, ' मी ? माझं नाव ठाऊक नाही तुला ? मी एक नवा ग्रह आहे. शुक्रापेक्षासुध्दा सुंदर मला निर्माण केल्यावर किती तरी वेळ ब्रम्हदेव कौतुकानं माझ्याकडं पाहत बसला होता ! पण... तू कोण आहेस ? ' त्यावर मुंगी म्हणाली, ' मी हरिणाहूनही सुंदर असा नवा प्राणी आहे. हत्ती, सिंह, हरिण, हे सारे घडवूनदेखील ब्रम्हदेवाचं समाधान झालं नाही. मग त्यानं आपल्या चारी डोक्यांतली बुध्दी पणाला लावून मला निर्माण केलं. ' इतक्यात एक मूल रांगत तिथे आले. वाटाण्याचा दाणा

चटकन् तोंडात टाकून ते मुंगीला धरु लागले. ती त्याच्या बोटात सापडेना ! त्या धडपडीत ती केव्हा चिरडून गेली, हे त्या मुलाला कळलेच नाही ! या कथेत आलेले मुंगी आणि वाटाणा या दोघांनाही अहंकार होता. ‘अहंकार’ या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने कधीही आपल्या जीवनात अहंकार बाळगू नये. कारण अहंकाराची किंमत शून्य असते.

## २.२ निष्कर्ष:

१) माणसाची मूलभूत प्रेरणा आहे जगावे व मनासारखे जगावे याची जाणीव करून त्याच्या परिपूर्तीचा मार्ग सांगणारा विचार म्हणजे जीवनवाद.

२) वि. स. खांडेकरांनी आपल्या कथांमधून जीवनमूल्ये मांडली आहेत.

३) 'सूर्यकमळे' या कथासंग्रहातील 'कोकिळा' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने जीवनात स्वत:जवळ असलेल्या कोणत्याही चांगल्या गुणाचा, कौशल्याचा अभिमान बाळगू नये.

४) 'कलिका' या कथासंग्रहातील 'परिस' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला कधीही कोणत्याही वस्तुचा मोह असता कामा नये. या मोहामुळे माणसाच्या मनात मत्सर, राग इत्यादी भावना उत्पन्न होतात. आणि मग माणूस रागाच्या भरात चुकीच्या निर्णयाकडे पोचतो.

५) 'मृगजळातील कळ्या' या कथासंग्रहातील 'चकोर व चातक' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला जीवनात काही मिळवायचं असेल तर त्याने संयम बाळगला पाहिजे.

६) 'अहंकार' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने कधीही अहंकार बाळगू नये. कारण अहंकाराची किंमत शून्य असते.

**संदर्भ:**

१) खांडेकर सखाराम विष्णू , ‘प्रसाद’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

२) खांडेकर सखाराम विष्णू , ‘सूर्यकमळे’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ५७.

३) खांडेकर सखाराम विष्णू , ‘कलिका’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ४४.

४) खांडेकर सखाराम विष्णू , ‘मृगजळातील कळ्या’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ८१.

५) खांडेकर सखाराम विष्णू , ‘अश्रु आणि हास्य’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १०३.

६) खांडेकर सखाराम विष्णू , ‘सरत्या सरी’, (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ८.

७) खांडेकर सखाराम विष्णू , ‘भाऊबीज’, (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. २१.

८) खांडेकर सखाराम विष्णू , ‘अजून येतो वास फुलांना’, (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

९) खांडेकर सखाराम विष्णू , ‘क्षितिजस्पर्श’ (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ३४.

१०) खांडेकर सखाराम विष्णू , ‘वनदेवता’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ७७.

प्रकरण ३

# वि. स. खांडेकरांच्या कथालेखनामधून दिसून येणारा वास्तववाद

## ३.१ प्रस्तावना

वास्तववाद म्हणजे व्यक्ती, प्रसंग, वस्तू, घटिते आदींचे म्हणजेच जीवनाचे यथातथ्य आविष्करण होय. जे खरे आहे ते जाणणे अगर जाणवून देणे म्हणजे वास्तववाद. वास्तववादी साहित्यात वास्तवाचे व्यक्तिनिरपेक्ष, अनुभवपूर्ण अस्तित्व मान्य केलेले असते.

वि. स. खांडेकर यांच्या ‘सूर्यकमळे’ या कथासंग्रहात ‘दीपस्तंभ’ ही कथा आली आहे. या कथेतील नायकाचे लग्न होऊन सहा वर्षे होऊन गेली होती. पण अजून त्याला मूलबाळ झालं नव्हतं. आपल्याला मूल नाही या गोष्टीचं त्याला फार वाईट वाटे. शेजारीपाजारी एखाद्या बाईला डोहाळजेवण झाले अगर एखादे बारसे झाले, की तिच्या दु:खाला नकळत चालना मिळे. अशा स्थितीत कोकणातला एक मोठा पूल बांधण्याच्या कामावर त्याची योजना झाली. त्याने स्वत: बरोबर आपल्या बायकोला कोकणात आणली होती. कोकणात आल्यापासून आपल्याला मूल व्हावं म्हणून ती देवपूजेत मग्न असायची. आपली बायको रात्री - अपरात्री बाहेर जाते कुठे याचेच त्याला कोडे पडले. कोकणात आल्यापासून घरी पूजेला एक भिक्षुक येत असे. आपली बायको रात्री - अपरात्री या भिक्षुकाच्या घरी जाते. आपल्या बायकोचे या भिक्षुकाबरोबर अनैतिक संबंध आहेत असा संशय या कथेतील नायकाला येतो. एके दिवशी तिने समुद्रावर जाऊन जोडप्यानं स्नान करण्याचा आपल्या नवऱ्याला आग्रह केला. दुसरे दिवशी ते समुद्रावर स्नानाला गेले. तिथे त्यांच्या घरी पूजेला येणारा भट होताच. त्या भटाच्या हातात आपल्या बायकोच्या हातातली अंगठी पाहून तर या कथेतील नायकाचा संशय अधिकच बळावला. त्याने त्या समुद्रात आपल्या बायकोला ढकलून तिचा जीव घेतला. त्या रात्री तो जेव्हा घरी आला आणि झोपला तेव्हा त्याच्या डोळ्याला डोळादेखील लागला नाही. पुलाचे अवाढव्य काम अर्धवट सोडून नायकाने रजा घेतली व तो मुंबईला निघून आला. नायकाला मुंबईत येऊन पाच - सहा महिने झाले होते. एके दिवशी नायक मलबार हिलवर, खाली पसरलेल्या मुंबईकडे शून्य दृष्टीने पाहत बसला होता. इतक्यात कोकणात त्यांच्या घरी पूजेला येणारा भिक्षुक त्याच्यापुढे उभा. तो त्याला विचारीत होता काय रावसाहेब, दुसरं लग्न केलं, की नाही ? लाखात नाही बाई सापडणार तुमच्या बायकोसारखी. मूल व्हावं, म्हणून किती तळमळत असत वहिनीबाई ! अर्चा काय आणि अनुष्ठानं काय ? काही म्हटल्या, काही कमी केले नाही त्यांनी. भिक्षुकाचे हे बोलणे ऐकून या कथेतील नायकाला आपण आपल्या बायकोवर घेतलेला संशय खोटा होता याची जाणीव झाली. या खोट्या संशयापायी उगाच आपण आपल्या बायकोचा जीव घेतला याचा आता त्याला पश्चाताप झाला. या कथेतील नायकाने आपल्या मनाशी दृढ निश्चय केला की ज्या द्वाराने मी तिला मृत्यूच्या प्रदेशात ढकलली, त्याच द्वाराने मी तिथे पाऊल टाकणार आहे. माझी आत्महत्या हाच तो दीपस्तंभ ! अशाप्रकारे या कथेतील नायक जहाजातून समुद्रात उडी घेऊन आत्महत्या करतो. वि. स. खांडेकर यांच्या ‘भाऊबीज’ या कथासंग्रहात ‘नीच कोण ?’ ही कथा आली आहे. या कथेमध्ये रावसाहेब आणि बाळ ही दोन पात्रे आली आहेत. हा जो बाळ असतो त्याची आई तापाने फणफणत असते. ती बरी व्हावी म्हणून तो शाळा चुकवून मोलमजुरी करून आठ आणे कमावतो. त्याला

आपल्या आईसाठी पावशेर दूध आणि तांदूळ हवे असतात. सरकारी दुकानात स्वस्तात तांदूळ घ्यायचे असं मनाशी ठरवलेलं असतं. तो तांदूळ विकत आणण्यासाठी जेव्हा रावसाहेब यांच्या दुकानात जातो तेव्हा ते त्याला आपल्या एका मित्राकडे जाऊन चंद्रहार आणायला सांगतात. रावसाहेब हा सावकार असतो. या रावसाहेबाने आपल्या बायकोला म्हणजेच कृष्णाजीला चंद्रहार केव्हाच आणून दिलेला असतो. पण तरीही चंद्रहार चोरल्याचा खोटा आळ हा रावसाहेब त्या बाळावर घेतो. त्याला पोलीस अटक करून घेऊन जातात. तो आपण चंद्रहार चोरला नाही असं पोलीसांना स्पष्टपणे सांगतो. या कथेतून त्या काळातील सावकार गरीबांचं कशाप्रकारे शोषण करायचे हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘फुले आणि दगड’ या कथासंग्रहात ‘दोन जगे’ ही कथा आली आहे. या कथेतील नायक दादा हे ड्रॉइंगमास्तर असतात. दादा हे हाडाने गरीब होते पण दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यात त्यांना मोठा आनंद होत असे. या कथेत गणपती नावाचे एक पात्र आले आहे. गणपती नावाचा एक महार मुलगा टेकडीवर गुरे चारायला घेऊन येई. एकदा त्या गुरांतला माजलेला रेडा एका वासराशी झुंज खेळू लागला. वासराला वाचविण्याकरिता राखण्या मधे पडला. पण सहा - सात वर्षांच्या त्या मुलाची शक्ती कितीशी असणार ? तो घाबरून ओरडू लागला. एका खडकावर वर्तमानपत्रे वाचीत बसलेल्या दादांच्या कानांवर त्याचे ओरडणे पडले. ते धावतच त्याच्याकडे गेले आणि त्याचा जीव वाचवला. सहा - सात वर्षांच्या एका हुशार पोराने दहावीस गुरे राखत बसावे ही गोष्ट दादांना अतिशय विचित्र वाटली. त्यांनी गणपतीच्या घरी जाऊन त्याच्या बापाची समजूत घातली तेव्हा कुठे गणपती मराठी शाळेत जाऊ लागला. त्याला शाळेसाठी लागणारी पुस्तके, कपडेलत्ते इत्यादी गणपतीला लागणारया गोष्टी दादा त्याला आनंदाने पुरवत. गणपती मराठी चौथी होऊन इंग्रजी शाळेत गेला. भराभर तो एकेक यत्ता मागे टाकू लागला. योग्य वेळी तो मॅट्रिक झाला. पुढे मुंबईला जाऊन गणपतीने आपलं बी. एचं शिक्षण पूर्ण केलं. एकच स्वप्न त्यांनी पाहिले. त्यांच्या सुदैवाने ते आज सत्यसृष्टीत उतरले होते. दादांजवळ चित्रकलेची कला असूनही परिस्थितीमुळे ते पुढे शिकू शकले नव्हते. पण गरीब ड्रॉइंगमास्तर होऊन एका दरिद्री, हरिजन मुलाला त्यांनी पदवीधर केले होते या गोष्टीचा त्यांना अभिमान वाटे. गणपतीला आता चांगली नोकरी मिळेल, आपण जसे शिक्षण घेऊन पदवीधर झालो त्याचप्रमाणे आपल्या हरिजनबंधूंना शिक्षण देण्यासाठी तो आपले तन - मन - धन अर्पण करील असं त्यांनी स्वप्न पाहिलं होतं पण त्यांचं स्वप्नभंग झालं. गणपतीला मुंबईला नोकरी मिळाली आणि तो तिथेच स्थायिक झाला. लहानपणी कोकणात वाढलेल्या गणपतीला आता गावाचा पार विसर पडला. या कथेतून खांडेकरांनी गणपती या गरीब महाराचे वास्तव जीवन या कथेतून मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘सुवर्णकण’ या

कथासंग्रहात ‘बुजगबाहुले’ ही कथा आली आहे. या कथेची सुरुवात अशी होते की लेखक एका शेताच्या कडेने चालला होता. पाखरांना भिवविण्याकरता शेतात उभ्या केलेल्या एका बुजगबाहुल्याला तो म्हणाला, ‘ या निर्जन शेतात एकसारखं उभं राहून कंटाळा येत असेल तुला ! नाही ? ’ तेव्हा ते बाहुले उद्गारले, ‘ वेड्या, दुसऱ्याला भिवविण्यात फार मोठा आनंद असतो. मला कधीच कंटाळा येत नाही या कामाचा ! ’ ते बाहुले म्हणाले, ‘ छे: ! ज्यांच्यांत पेंढा भरलेला असतो, त्यांनाच त्या आनंदाची खरी गोडी कळू शकते ! ’ एक वर्ष लोटले. पुन्हा तो त्या शेताच्या बाजूने जाऊ लागला. आता त्याच्या टोपीखाली दोन कावळे घरटे बांधीत असलेले त्याला दिसले. या कथेतले बुजगबाहुले म्हणते, ‘ आत पेंढा भरलेला असल्याशिवाय भीतीच्या आनंदाचा खराखुरा उपभोग कुणीही घेऊ शकत नाही ! ’ पण दुसऱ्याला भिवविण्याकरता अंतरंगात भरलेला पेंढा कालांतराने गळून पडतो. पाखरांना भिवविणाऱ्या बुजगबाहुल्याच्या टोपीखाली कावळे घरटे बांधू लागतात ! जगात चिरंतन धर्म एकच आहे - भक्ती, प्रीती ! भीती किंवा शक्ती हा नव्हे हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘वनदेवता’ या कथासंग्रहात ‘मासे’ ही कथा आली आहे. या कथेची सुरूवात अशी होते मोठ्या माशाने लहान माशाला गिळण्याकरिता तोंड उघडले. तो चिमुकला मासा कापऱ्या स्वराने म्हणाला, ‘ दादा, दादा... ’. त्यावर मोठा मासा उद्गारला, ‘ ही लाडीगोडी बस्स कर. मला भूक लागली आहे ! ’ त्यावर लहान मासा मोठ्या माशाला म्हणाला, ‘ पण...पण... आपण एका जातीचे ! आपणच एकमेकांना खाऊ लागलो तर - असा अन्याय करु नका, दादा ! ’ ‘ यात अन्याय कसला आलाय ? ’ तो मोठा मासा हसत उद्गारला , ‘ हा जगाचा न्यायच आहे ! ’ पुढे एके दिवशी या मोठ्या माशाला एका प्रचंड माशाने पकडले. त्याच्या तोंडातून या मोठ्या माशाला काही केल्या सुटता येईना. त्या प्रचंड माशाच्या तोंडात जाता - जाता मोठ्या माशाला त्या लहान माशाची आठवण झाली. तो लहान मासा म्हणत होता, तेच बरोबर होतं. या कथेतून खांडेकरांनी उच्च वर्गाकडून खालच्या वर्गाची होत असलेली पिळवणूक हे वास्तव या कथेतून त्यांनी मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘वनदेवता’ या कथासंग्रहात ‘अंकुर’ ही कथा आली आहे. या कथेची सुरूवात अशी होते. या कथेतील अंकुर वाढत चालला. हां हां म्हणता तो लहान मुलाएवढा झाला. लवकरच तो तरुणासारखा दिसू लागला. तरी तो वाढतच होता ; पसरतच होता ! काही दिवसात त्याचे एका मोठ्या वृक्षात रूपांतर झाले. साऱ्या पृथ्वीला सावली द्यायच्या स्वप्नात तो वृक्ष धुंद होऊन गेला होता. भयंकर उन्हाळ्यातही तो वृक्ष हिरवागार राहिलेला पाहून वाटसरू चकित होऊ लागले. त्याच्यावर देवाची विशेष कृपा असली पाहिजे, अशी त्यांची खात्री झाली. जाणाऱ्या - येणाऱ्याकडून वृक्षाची पूजा होऊ लागली. या पूजेने वृक्षाला आभाळ ठेंगणे झाले. पाखरे त्याच्या कानांत

किलबिलू लागली, ‘ इथून जवळ एक नगर आहे. त्या नगरात एक राजवाडा आहे. या राजवाड्याभोवती मोठी सुंदर बाग आहे. नगर पाहायला गेलो, की आम्ही त्या बागेत जाऊन फळं खातो. पण ती तुझ्या फळांसारखी गोड नाहीत. तू त्या बागेत असायला हवंस, गड्या ! साऱ्या वृक्षांचा राजा होशील तू. राजवाड्यावरुन जाणारा प्रत्येक मनुष्य तुला मुजरा करीत जाईल ! ’ एके दिवशी नाचत नाचत वायुलहरी आल्या आणि त्या वृक्षाला म्हणाल्या, ‘ राजाच्या बागेत नाना रंगांची फुलं आहेत. पण त्यांतल्या एकाला सुध्दा तुझ्या फुलांसारखा सुगंध नाही. काल आम्ही तुझा सुगंध घेऊन गेलो. त्या वेळी राजकन्या बागेत फिरत होती. तुझ्या सुगंधानं ती वेडी होऊन गेली. मित्रा, बागेत तू असायला हवंस ! अप्सरेहूनही सुंदर असलेली ती राजकन्या अष्टौप्रहर तुझ्या सावलीत राहील. ’ हे ऐकून वृक्ष अतिशय अस्वस्थ झाला. चित्रविचित्र उन्मादक स्वप्नांची त्याच्या डोळयांवर धुंदी चढली. भोवतालच्या माळाचा उजाडपणा त्याला असह्य झाला. अस्सेच्या अस्से उठावे आणि धावत बागेकडे जावे, असे त्याला वाटू लागले. इतक्यात कुणीतरी मृदु स्वराने त्याला हाक मारली, ‘बाळ’. ‘ कोण हाक मारतंय मला ? ’ वृक्षाने तिरसटपणाने प्रश्न केला. त्यावर धरणीमाता उद्गारली, ‘ तुझी आई ! ’ बाळ, राजाच्या बागेत जायचा वेडा विचार सोडून दे. तुझ्या आयुष्याचं सार्थक इथंच आहे. त्यावर रागाने  बेभान झालेला तो वृक्ष चीत्कारला, ‘ इथं ? ’ त्यावर धरणीमाता उद्गारली, ‘ हो, इथं ! या जगात प्रत्येकाच्या कर्तृत्वाला मर्यादा असते. उपभोगाला सीमा असते ! ’ दुसऱ्याच क्षणी त्याने धरणीमातेला जोराने लाथाडून दूर झुगारून दिले आणि ... आणि त्याच क्षणी तो निष्प्राण होऊन धाडकन खाली पडला. अशाप्रकारे स्वत:च्याच हेकेखोर वृत्तीमुळे तो आत्मनाशास प्रवृत्त होतो. यावरून, वृक्षामधील वाढीस लागलेला अहंकार हा आजच्या युवापिढीच्या अहंकाराचे प्रतिक म्हणता येईल. ही अहंभावनाच आत्मनाशाला कारणीभूत ठरते. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘मृगजळातील कळया’ या कथासंग्रहात  ‘एक तळे’ ही कथा आली आहे. या कथेची सुरुवात अशी होते की त्या गावातली सर्व भाविक माणसे आपली पूजा यथासांग व्हावी म्हणून त्या तळयाच्या काठी नियमाने येत असत. बहुतेक लोक भराभरा त्या तळयातली हवी तेवढी कमळे खुडत. दुपारी शेजारच्या शिवालयातली पूजा सुरू झाली, अष्टोत्तर कमळे वाहून भक्तगणाने वाजविलेल्या घंटेचा नाद कानावर पडू लागला की, त्या तळयाला आपल्या आयुष्याचे सार्थक झाले असे वाटे. एके दिवशी ते या आनंदात मग्न असताना एक बगळा तिथे आला. तळयाकडे पाहून त्याने नाक मुरडले. तळे त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागले. बगळा वेडावाकडा चेहरा करून म्हणाला, “ छी: ! छी: ! काय घाण पाणी आहे हे ! आपण तर याला चोच लावायलासुध्दा तयार नाही बुवा! ’’ कमळे खुडून नेणाऱ्या माणसांच्या पायांनी आपले पाणी गढूळ झाले आहे

हे तळ्याच्या लक्षात आले. बगळा गंभीरपणे उद्गारला, “ मी शेकडो नद्या पाहिल्या आहेत, समुद्रसुध्दा पाहिला आहे. पण इतकं घाण पाणी मात्र कुठंच पाहिलं नाही ! समुद्राचं पाणी कसं स्फटिकासारखं शुभ्र आहे ! आणि हे पाणी. ” बगळा दूरदूर जाऊ लागला. त्याला हाक मारून तळे म्हणाले, “ आज माझी चूक मला कळली. चार दिवस धीर धर. चार दिवसांत माझं पाणी गंगेइतकं शुभ्र होतं की नाही हे पाहा ! " कमळे न्यायला येणाऱ्या प्रत्येक मनुष्यापाशी तळ्याने आपला चिखल उपसून टाकण्याचा हट्ट धरला. वर्षानुवर्षे आपल्या पूजेला तळ्याने दिलेली कमळे लक्षात घेऊन सारी भाविक मंडळी गाळ उपसू लागली. तळ्यात चिखल अजिबात उरला नाही. आपले पाणी गंगेइतके स्वच्छ झाले या आनंदात तळे दंग झाले. पण लवकरच तळ्यात जी कमळे फुलायची त्या कमळांच्या सर्व वेली सुकून गेल्या. तळ्यात एकही कमळ फुलेना. तळ्याला आपले जीवन अगदी रूक्ष, नीरस वाटू लागले. या कथेतील जो बगळा आहे त्याने आपला स्वार्थ साधून घेतला. त्या तळ्याचे पाणी स्वच्छ झाल्यामुळे बगळ्याला खायला भरपूर मासे मिळाले. मात्र तळ्यात चिखल न उरल्यामुळे एकही कमळ फुलेना त्यामुळे तळ्याला आपले जीवन नीरस वाटू लागले. स्वत: च्या स्वार्थासाठी परार्थाची हानी करताना माणूस अंधपणाने वागतो आणि स्वार्थ साधल्यानंतर तिचे गुणगान करीत बसतो. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे. वि. स. खांडेकर यांच्या ‘कलिका’ या कथासंग्रहात ‘मोत्याचे पीक’ ही कथा आली आहे. पाणबुड्यांनी वरूणदेवतेची प्रार्थना केली, ‘ देवा, यंदा नुसत्या स्वातीचा पाऊस पाड. खूप खूप मोती पिकू देत. गोरगरिबांच्या मुलांच्या कानांत डूल झुलू देत. त्यांच्या बायकांच्या हातांत मोत्यांची काकणे फुलू देत. मंदिरांच्या दारादारावर मोत्यांचे पडदे हलू देत. ’ पावसाळा आला. लोक मृगाची अत्यंत उत्कंठेने वाट पाहत होते. मघा आल्या तशाच गेल्या. मघात पाऊस पडलाच नाही. मानवी मन हे आशावादी असतं. मनाला वाटलं मृगात नाही पडला, मघात नाही पडला पण हस्तात पाऊस पडेलच पडेल. स्वाती नक्षत्र आलं, स्वाती नक्षत्रात मात्रं उभ्या वर्षाचा भरपूर पाऊस कोसळला. स्वाती नक्षत्रात जो उभ्या वर्षाचा भरपूर पाऊस कोसळला त्याने पाणबुडे मात्र खूश झाले. इतके मोत्यांचे शिंपले त्यांनी उभ्या जन्मात पाहिले नव्हते. श्रमाने आणि आनंदाने ते झोपी गेले. ते जागे होऊन पाहतात ते समोर मोत्यांच्या उंच उंच राशी पडलेल्या ! एकाला वाटले, भाताची रास असेल ही ! दुसऱ्याला वाटले जोंधळ्याची रास असेल ती ! पाणबुड्यांनी आपल्या डोळ्यांवरून हात फिरविला. कुणीही स्वप्नात नव्हता. त्यांच्यासमोर पसरलेल्या साऱ्या राशी मोत्यांच्या होत्या. शेतकरी मात्र रडत होते, व्यापारी कुढत होते कारण त्यांना हवा असलेला मृगाचा पाऊस पडला नाही. स्वातीच्या पावसानं फक्त मोती पिकतात. ज्वारी, गहू, तांदूळ आणि बाजरी हे जे अन्न लागतं खायला ते मिळत नाही. प्रत्येकाच्या पोटात कावळे ओरडू लागले

होते. मोत्यांनी भरलेले हारे डोक्यावर घेऊन पाणबुडे लोकवस्तीच्या दिशेने धाऊ लागले. ते गावात आले. घरोघर फिरले. पण मूठ मूठभर मोती घेऊनसुध्दा भाकरी देणारा मनुष्य त्यांना भेटला नाही. झोपडीत, घरात, मंदिरात सुखाच्या सर्व वस्तू होत्या. फक्त एकच गोष्ट नव्हती - अन्न ! चालून चालून पाणबुड्यांचे पाय गळून गेले होते. डोक्यावरल्या मोत्यांचे ओझेही त्यांना आता असह्य झाले होते. एका देवळात देवापुढे हात जोडून बसलेल्या संन्याशाला त्यांनी विचारले, ' जगातलं सारं अन्न गेलं कुठं ? ' त्यावर संन्याशी उत्तरला, अन्न आलंच नाही, मग जाणार कुठं ? मृगाचा पाऊस नाही, मघाचा पाऊस नाही, हस्ताचा पाऊस नाही. फक्त स्वातीचा पाऊस पडला. त्या पावसाचा पोटाला काय उपयोग ? त्यानं फक्त मोती पिकतात. संन्याशाच्या या बोलण्याने आता पाणबुड्यांना कळून चुकले की आपण गोळा केलेल्या मोत्यांना अन्नापुढे काहीच किंमत नाही. कारण माणसाला जगण्यासाठी अन्न लागतं. सारे पाणबुडे वेड्यासारखे समुद्राकडे धावत गेले. ते सारे मोत्यांचे हारे त्यांनी समुद्रात ओतले. पाणबुड्यांनी हात जोडून वरूणदेवतेची प्रार्थना केली, ' देवा, मृगाचा पाऊस पडू दे, मघाचा पाऊस पडू दे, हस्ताचा पाऊस पडू दे. स्वातीचा पाऊस पडला नाही तरी चालेल. माणसाला जगण्यासाठी मोत्यांहूनही अन्न महत्वाचं आहे. कारण अन्नावाचून माणूस जगूच शकत नाही. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

वि. स. खांडेकरांच्या 'विकसन' या कथासंग्रहात 'गोफ' ही कथा आली आहे. या कथेत लीलाबाई, माधवराव, त्यांच्या दोन मुली शालिनी आणि माली ही पात्रं आली आहेत. लीलाबाईंना त्यांची पोटदुखी हल्ली वर्षभर त्रास देत होती. या पोटदुखीमुळे लीलाबाईंचं हल्ली डॉक्टराकडे जाणं चालूच होतं. डॉ. गद्रे तसे अगदी त्यांचे घरचे डॉक्टर होते. पहिल्यापहिल्यांदा लीलाबाईंनी आपली पोटदुखी मुकाट्यानं सोसली. लीलाबाई या स्वभावानं भित्र्या होत्या. कोर्ट, तुरूंग, हॉस्पिटल या साऱ्या गोष्टींचं त्यांना नेहमी भय वाटे. त्यांच्या मनात येई, एकदा हॉस्पिटलमध्ये पाऊल टाकल्यावर डॉक्टर काय काय सांगतील ते देव जाणे. अल्सर, कॅन्सर असलं काही निघालं तर ? तिची मुलगी शालिनी छोट्या ट्रेमध्ये किटली व दोन कपबशा घेऊन आली. तिनं थोडं उप्पीटही केलं होतं. ती बशी पाहताच लीलाबाई म्हणाल्या, ' मला खूप खावंसं वाटतं गं. पण ही पोटदुखी. वेळी - अवेळी पोटात दुखायला लागतं ! ' शालिनीच्या आग्रहाखातर त्यांनी उप्पीटाचे दोन घास घेतले. लीलाबाई चहा घेऊन पडल्या. अंथरूणात पडल्या पडल्या लीलाबाई दवाखान्यात झालेल्या तपासण्यांचा विचार करू लागल्या. डॉक्टरांनी पोटात दुखण्याचं निदान का सांगितलं नाही ? तसे डॉ. गद्रे मनमोकळे आहेत. मग ते इतके गंभीर का दिसत होते. या तपासणीतून कॅन्सर असं निघालं तर. या विचारासरशी तिच्या अंगावर काटा उभा राहिला. छाती धडधडू लागली. कॅन्सर झालेल्या लोकांचे वेदनांनी कसे हालहाल होतात हे त्यांनी पुष्कळांकडून ऐकलं होतं. मुंबईत

जाऊन पैसा खर्च करायचा आणि शेवटी हालहाल होऊन मरायचं. स्वत:च्या वेदनांची आणि मरणाची चित्रं त्यांना भेडसावू लागली. इतक्यात बाहेरून शालिनीचा गोड आवाज ऐकू येऊ लागला. ती म्हणत होती त्या ओळी कुठल्या तरी कवितेच्या असाव्यात. लीलाबाई कान देऊन ऐकू लागल्या. त्यांच्या कानावर पुन्हा पुन्हा शब्द पडू लागले. हळूहळू त्या ओळींची त्यांच्या मनात जुळणी झाली. शालिनी म्हणत होती ती कविता अशी होती. ‘ पदर आणिले तुझे काही तू , माझे आणी मीहि तसा । हासत खेळत गोफ गुंफिला, कळले नाही कधी कसा ॥ शालिनी पुन्हा पुन्हा त्या ओळी घोळवून म्हणत होती. लीलाबाईचं मन त्या ओळींच्या अर्थात बुडून गेलं. अर्धवट तंद्रीत त्यांना वाटू लागलं, ही आपल्या व माधवरावांच्या संसाराचीच कहाणी आहे. रात्र झाली लीलाबाई माधवरावांची वाट पाहत जाग्या होत्या. इतक्यात दारावरली घंटा वाजली. लीलाबाई उठल्या. त्यांनी जाऊन दार उघडले. साऱ्या शिकवण्या संपवून आलेल्या माधवरावांच्या चेहऱ्याकडं त्यांची नजर गेली. तो उतरलेला दिसत होता. त्यांनी कातरस्वरानं विचारलं, ‘ बरं वाटत नाही का ? ’ माधवराव हसत हसत म्हणाले, ‘ आजाऱ्याला जिकडं तिकडं आजारच दिसतात वाटतं ! मला काही काही झालेलं नाही. कामानं थोडा शीण येतो. तू जेवलीस ना ? ’ लीलाबाईचं आणि माधवरावांचं जेवण झालं. माधवराव झोपायला गेले तेव्हा लीलाबाईंना वाटलं माधवरावांना झोप येत नसावी. दिवसभर दमून येतात. खाटेवर अंग टाकलं की, पाच मिनिटात गाढ झोपी जातात. मग आजच काय झालं. डॉक्टरांनी त्यांना आपल्या पोटदुखीचं निदान सांगितलं असावं. काळजी करण्यासारखं काही असेल का ? कॅन्सर.... ? लीलाबाईंना वाटलं, डॉक्टरांनी नक्कीच माधवरावांना असं काही सांगितलं असेल. ते आपल्याला कसं सांगावं या काळजीनं ते व्याकूळ झाले असावेत. ते नीट जेवले नाहीत. त्यांना धड झोपही लागली नाही असं काहीतरी वेडंवाकडं असल्याशिवाय. कॅन्सरच्या कल्पनेनं त्यांच्या काळजाचा थरकाप झाला. क्षणभरानं स्वत:ला सावरून त्या विचार करू लागल्या. काही असलं तरी असं घाबरून कसं चालेल. संकटाकडं पाठ फिरवून ते दूर होतं का कधी ? लीलाबाईंना वाटलं आपल्या भित्र्या स्वभावामुळेच त्यांना खरं जे काही असेल ते सांगण्याचा धीर झाला नाही. आवाज न करता त्या आपल्या खाटेवरून उतरल्या. खोलीच्या समोरच्या भिंतीपाशी असलेल्या माधवरावांच्या खाटेपाशी गेल्या. लीलाबाई त्यांना म्हणाल्या, माझ्या गळ्याची शपथ आहे. डॉक्टरांनी काय निदान केलंय ते सांगा. माधवराव तिला म्हणाले तसं घाबरण्यासारखं काही नाही गं. ऑपरेशन करावं लागणार आहे. ट्यूमर आहे असं डॉक्टर म्हणाले. लीलाबाई माधवरावांना म्हणाली, ऑपरेशनची तारीख ठरवायला सांगा डॉक्टरांना. मी तयार आहे ऑपरेशन करायला.

## ३.२ निष्कर्ष:

१) वास्तववाद म्हणजे व्यक्ती, प्रसंग, वस्तू, घटिते आदींचे म्हणजेच जीवनाचे यथातथ्य आविष्करण होय.

२) 'भाऊबीज' या कथासंग्रहातील 'नीच कोण ?' या कथेतून त्या काळातील सावकार गरीबांचं कशाप्रकारे शोषण करायचे हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

३) 'वनदेवता' या कथासंग्रहातील 'मासे' या कथेतून उच्च वर्गाकडून खालच्या वर्गाची होत असलेली पिळवणूक हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

४) 'सुवर्णकण' या कथासंग्रहातील 'बुजगबाहुले' या कथेतून जगात चिरंतन धर्म एकच आहे - भक्ती, प्रीती ! भीती किंवा शक्ती हा नव्हे हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

५) 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहातील 'एक तळे' या कथेतून स्वत:च्या स्वार्थासाठी परार्थाची हानी करताना माणूस अंधपणाने वागतो आणि स्वार्थ साधल्यानंतर तिचे गुणगान करीत बसतो. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

६) 'कलिका' या कथासंग्रहातील 'मोत्याचे पीक' या कथेतून माणसाला जगण्यासाठी मोत्यांहूनही अन्न महत्वाचं आहे. कारण अन्नावाचून माणूस जगूच शकत नाही. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

**संदर्भ:**

१) खांडेकर सखाराम विष्णू , 'सूर्यकमळे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ४५.

२) खांडेकर सखाराम विष्णू , 'भाऊबीज', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. २१.

३) खांडेकर सखाराम विष्णू , 'फुले आणि दगड', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ५३.

४) खांडेकर सखाराम विष्णू , 'सुवर्णकण', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ४९.

५) खांडेकर सखाराम विष्णू , 'वनदेवता', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ६४.

६) खांडेकर सखाराम विष्णू , 'मृगजळातील कळ्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ६३.

७) खांडेकर सखाराम विष्णू , 'कलिका', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ८.

८) खांडेकर सखाराम विष्णू , 'विकसन', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १०८.

प्रकरण ४

# वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या

## ४.१ प्रस्तावना

माझे चौथे प्रकरण आहे वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या. या प्रकरणात मी उच्च मध्यमवर्गीयांच्या, विद्यार्थ्यांच्या, मजुर कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या मांडल्या आहेत.

## ४.२ वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून दिसून येणाऱ्या सामाजिक समस्या

वि. स. खांडेकरांच्या कथासाहित्यातून चित्रित होणारी सामाजिक समस्या समाजातील अवतीभवतीच्या वातावरणापासून त्यांच्या स्वत:च्या अनुभवातून त्यांना ज्या विविध स्वरूपाच्या समस्या जाणवल्या त्या त्यांनी कथेसारख्या वाङ्मयीन कलाकृतीतून मांडल्या. हरिभाऊंच्या भाषेचाही पगडा त्यांच्या कथांतून जाणवतो. एखाद्या अडचणीत असलेल्या कुटुंबाला आपल्या घरात आश्रय दिला तर उपकार न मानता त्याची फेड उपकाराने न करता अपकारानेच केली जाते. याचे चित्रण 'भाऊबीज' या कथासंग्रहातील 'घर कोणाचे ?' या कथेत येते. ज्या सरस्वतीने पंतांना आश्रय दिला. तिलाच शेवटी आपल्या स्वत:च्या राहत्या घरातून अपमानित होऊन आजारी रघुला घेऊन घर सोडून जावे लागते. आईवाचून पोरकेपणा जर एखाद्या मुलीच्या वाट्याला आला तर त्या मुलीच्या आयुष्याची होणारी वाताहात 'विद्युतप्रकाश' या कथासंग्रहातील 'हिरा तो भंगला' या कथेत येते. केवळ पाचशे रूपयांसाठी हिराला आयुष्यभर वेंगुर्ल्याच्या सावकाराची रखेल होऊन रहावे लागते. आपला भाऊ जयवंता कोणत्याही परिस्थितीत आपल्याला पाचशे रुपये मावशीला देऊन सोडवील ही हिराची आशा फोल ठरते. या कथेतील सावकाराकडून या मुलीवर अत्याचार होतात. या परिस्थितीत ती मुलगी आपलाच दोष समजून मुंबईला जाते. मुंबईसारख्या मायावी नगरीत तिला स्वत:चे पोट भरण्यासाठी शरीरविक्रयाचा व्यवसाय करावा लागतो. 'पूजन' या कथासंग्रहातील 'भावना' या कथेतील सामाजिक समस्या ही राजकारणी लोकांच्या जिवंतपणी अत्याचाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींची आहे. आपल्या हाती सत्ता आहे. तेव्हा आपण कोणत्याही प्रकारची मनमानी करू शकतो हा त्यांचा अहंकार सहजपणे दुसऱ्याचे आयुष्य उध्वस्त करून जातो.

### ४.२.१ उच्च मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधीची उच्चवर्गीय किंवा मध्यमवर्गीयांची स्थिती ही एका विशिष्ट परिस्थितीशी निगडीत होती. होता होईल तेवढे आपल्या कनिष्ठ वर्गाचे शोषण करणे आणि आपण आपले स्थान निश्चित करावे याकडे त्यांचा कल होता. शिक्षण, व्यवहारज्ञान यांचा अभाव असणाऱ्याचीच जास्त पिळवणूक होत असे. चांगले विचार, चांगली वाट याच्या माध्यमातून जीवनाला चांगले मिळालेले वळण इतरांकडे पाहताना माणुसकीच्या नात्याने पहावयास शिकवते असे प्रत्येकवेळीच घडत नाही. कधी वेगळा विचारही मनात येऊ लागतो. दुसऱ्यांच्या विषयी किंवा आपल्या समाजातील लोकांविषयी मनात असूया निर्माण होऊ लागते. 'ढगाआडचे चांदणे' या कथासंग्रहातील 'अस्थि' या कथेतील संपत हा गरिबीतून पुढे जाऊन राजकारण श्रीमंती या उच्चवर्गीयात स्थिरावलेल्या सामाजिक स्तराचा प्रतिनिधी ठरतो. त्याला आपल्या पूर्वायुष्याचा विसर पडतो. ज्या जनतेने आपल्यावरती विश्वास ठेवला त्यांचीच हा वैचारिक पातळीवर अवहेलना चालवितो. समाजातील राहणीमानानुसार बदलत जाणारा वर्ग आर्थिक श्रीमंती मिळवितो परंतु वैचारिक पातळीवर मात्र खालावत राहतो. 'हस्ताचा पाऊस' या कथासंग्रहातील 'बाहुली' या कथेत डॉ. विश्वनाथ आपल्या व्यवसायात रमून जातो. तर त्याच्याबरोबर चळवळीत काम करणारी दुर्गा भूमिगत होते. खांडेकरांच्या या कथेत चित्रित केलेली मध्यमवर्गीयांची समस्या स्वातंत्र्यप्रेरणेने भारावलेल्या देशभक्तांच्या बाजूने त्या विचारांचे क्षेत्र; विधायक कार्यकर्ते मानवसेवेतून आपले जीवन पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न करतात. तर काही वेळा पाठही फिरवितात. रक्ताच्या नात्यातील पडत  चाललेला विसर ‘घरट्याबाहेर’ या कथासंग्रहातील 'पतीत' या कथेतील मधुकराच्या स्वार्थातून चित्रित होतो. चंगळवादाच्या पाठीमागे  लागणाऱ्या माणसांची मने स्वत:च्या रक्ताची नातीसुध्दा विसरतात. समाजातील ‘पतीत’ प्रवृत्ती ठिकठिकाणी स्वार्थासाठी माणुसकी विसरतात. वि. स. खांडेकरांच्या कथेतील मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या ह्या परिस्थितीनुसार बदलताना दिसतात. स्वत:च्या कोशात जगणारी माणसे, शिक्षणासाठी कुटुंबातील अन्य कारणास्तव इतरत्र जातात. तिथे त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव येतात. तिथल्या वातावरणाचे संस्कार होतात. त्यातून कोणी स्वत:ची नाती विसरून एका वेगळ्या विश्वाचा विचार करतात तर, आपल्या वैयक्तिक दु:खापेक्षा समाजातही इतर खूप दु:ख आहेत यांचा विचार करताना ती आत्मकेंद्रातून बाहेर पडून समाजाचाही विचार करतात.

### ४.२.२ विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्या

‘समाधीवरली फुले’ या कथासंग्रहात ‘आज आणि उद्या’ ही कथा आली आहे. या कथेतील दादा डॉक्टरकीचे शिक्षण घेऊन एका विधवेशी की जिच्या पदरी मनी नावाची एक मुलगी आहे तिच्याशी विवाह करतो. पुढे ती मनी मोठी झाल्यावर कामगारांच्या चळवळीत भाग घेते. चळवळीत भाग घेतल्यामुळे पतीचा विरोध होतो आहे हे तिच्या लक्षात येताच ती वेगळं राहण्याचा निर्णय घेते. यावरून ‘आज आणि उद्या’ या कथेतून बदलत्या सामाजिक मनाचे चित्रण, दोन पिढ्यातील वैचारिक संघर्ष मांडत असताना बदलत्या विचारसरणीच्या सामाजिक समस्या मांडल्या आहेत. 'दवबिंदू' या कथासंग्रहात ‘चंद्रकोर’ ही कथा आली आहे. या कथेतील अंतोनचे इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी वसंताच्या वडिलांनी अंतोनच्या वडिलांच्या दुकानात दारू पिणे आवश्यक ठरते आहे असे का ? याचा उलगडा मात्र छोट्या अंतोनला होतच नाही. त्याच्या शंकेचे निरसन करताना ‘ असलं श्रीमंत गिऱ्हाईक गेलं तर पैसे कुठून मिळणार तुला शिकायला ?’ असे त्याच्या वडिलांना अंतोनसमोर स्पष्ट बोलावे लागते. या कथेतून मांडलेली समस्या गरीब कुटुंबातील एका आजीचा आपल्या नातवाच्या शिक्षणाला आधार वाटतो. ती आपल्या विधवा सुनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. तिसरीपर्यंत मराठी शिक्षण त्यानंतर मॅट्रिकपर्यंत इंग्रजी शिक्षण घेऊन भिन्न ओळखीने मुंबईला जातो. तिथे त्याला नोकरी मिळतच नाही तर शिक्षण आणि माणुसकी यांच्याशी जवळीक साधणारे वर्तनही त्याला कुठे दिसत नाही. आपल्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या आजीला, आईला, बहिणीला आपल्यापेक्षा लहान भावांना आपण सुखी करू असे भिवाला वाटते. परंतु प्रत्येक वेळेला त्याला निराश व्हावे लागते. त्याच्या कुटुंबाबरोबर त्याच्या गावातल्या लोकांनाही भिवाच्या नोकरीचे कुतूहल असते. ह्यानंतर आजीचे आजारपण, शेतीतील करावी लागणारी कामे त्याला नकोशी वाटू लागतात. शहरातील डोळ्यांनी पाहिलेले पांढरपेशेपण त्याच्याभोवती पिंगा घालू लागते. त्याला घरचे, शेतीचे काम कमी दर्जाचे वाटू लागते. इंग्रजी विचारांचा पगडा त्याच्या मनावर पडलेला असतो. ‘कर्तव्यनिष्ठा’ या गुणाच्या आधारावर त्याच्यावरती केलेले संस्कार त्याला आपल्या पूर्वजांच्या कष्टाची जाणीव करून देतो. आपले पूर्वज अशिक्षित असले तरी त्यांची जीवनावर असणारी निष्ठा. ती निष्ठा त्याला शहाणपण शिकविते. यातून खेडेगावातील इंग्रजी शिक्षण हे गरिबांसाठी नाही ती एका विशिष्ट वर्गाचीच मक्तेदारी ठरते.

### ४.२.३ मजुर कामगारांच्या सामाजिक समस्या

अपुरे शिक्षण ही पण कामगारांची समस्या असते. ‘घरट्याबाहेर’ या कथासंग्रहात ‘नवे जग’ ही कथा आली आहे. या कथेतील वामन मॅट्रिकनंतर आपल्या घरची खाणारी वाढलेली तोंडे या साऱ्याला वैतागत असतो. आपल्या आजारी मुलाला औषध आणण्यास तो असमर्थ ठरतो याचे कारण मुंबईतील गिरणीच्या संपाची झळ त्याच्या घरापर्यंत पोहोचलेली असते. त्याच्या भावाचे कुटुंबही गावी परत आलेले असते. डॉक्टर माणुसकी व आपले कर्तव्य समजून त्याच्या मुलासाठी औषध देतात अशाप्रकारे मालक आणि कामगार यांच्यातील लढा काही ठिकाणी माणुसकीचे दर्शन घडवितो. तर काही ठिकाणी माणुसकीची घुसमट करताना दिसतो. ‘अश्रु आणि हास्य’ या कथासंग्रहात ‘मुके प्रेम’ ही कथा आली आहे. जयराम हा या कथेतला नायक आहे. त्याला मुलगा झाल्यावर त्याची बायको मरण पावते. जन्म:त शरीराला असणारे आपल्या अपत्याचे अधूपण या कामगाराच्या मार्गातील अडसर होतो. ही माणसे कष्टाच्यामागे धावतच असतात. ही कामगाराची समस्या या कथेतून त्यांनी मांडली आहे.

### ४.२.४ शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या

‘घरट्याबाहेर’ या कथासंग्रहात ‘घरट्याबाहेर’ ही कथा आली आहे. आजारपणात वेळेवर न मिळणारे औषधपाणी, त्याची अविचारामुळे होणारी फरफट ओढावून घेतलेला मृत्यू याचे चित्रण ‘घरट्याबाहेर’ या कथेत मंजुळेच्या बाबतीत घडते. तिचा नवरा न्युमोनियाने आजारी असतो. शेतकरी कुटुंबाला आजारी पडल्यानंतर आर्थिक अडचणीमुळे परगावांहून डॉक्टर आणणे परवडणारे नसते. त्याच्यावर उपचार करणारे त्याचे शेजारी डोके चिरून त्यात कसल्यातरी झाडपाल्याचे औषध भरतात. त्यातच मंजुळेच्या पतीचा मृत्यू होतो. परंपरेनुसार चालत आलेल्या आपला भिक्षुकीचा व्यवसाय व गरजेपुरते शेत याच परंपरांना चिकटून राहिल्यामुळे ‘प्रसाद’ या कथासंग्रहातील ‘पार्वती’ या कथेतील पार्वतीला कोणताही दोष नसताना अन्यायच सहन करावा लागतो. तिच्या पतीला वेगवेगळे व्यवसायांचा प्रयोग करून बघण्याची सवय असल्यामुळे त्याचा कोणताच व्यवसाय चालत नाही. धंद्यातील खोट तो पचवू शकत नाही. बिचारी पार्वती विधवा होते. तिला माधवने व्यवहारापुरते मराठी लिहायला - वाचायला शिकविलेले त्यामुळे तिची शिकण्याची आवड आणखी पुढे गेलेली असते. ती थोडीफार इंग्रजीही शिकते व माधवजवळ नर्स होण्याची इच्छा व्यक्त करते. परंतु तिचे वडील विठोबाअण्णा यांना पार्वतीचा विचार पटत नाही. ते पाताळेश्वराला कौल लावतात. पाताळेश्वर नकाराचा कौल देतो. पार्वतीने पाताळेश्वराची सेवा करावी असे ठरते. गरजेपेक्षाही कमी असणारी शेतजमीन त्यांच्या कुटुंबाची कोणत्याही प्रकारची गरज पूर्ण करू

शकत नाही. त्यांचा मुलगा निळकंठ हा पण नाटक कंपनीत काम करतो. तिथे त्याला दाम गरजेपुरते मिळत नाही. खांडेकरांच्या कथेतील शेतकऱ्यांच्या समस्या त्यांच्या अज्ञानातून निर्माण होताना दिसतात. मोठ्या प्रमाणात कष्ट करूनही त्यांच्या प्राथमिक गरजा भागत नाहीत.

### ४.३ वि. स. खांडेकरांच्या रूपककथेतील सामाजिक समस्या

मानवाच्या स्वार्थी स्वभावामुळे त्याच्यातील माणुसकी नष्ट होत चालली आहे. खांडेकरांनी मानवी जीवनातील, मनातील हिंसा, अहंकार, स्वार्थी वृत्तीतून सामाजिक समस्या निर्माण होतात हे रूपककथेतूनही सांगितले आहे. 'मृगजळातील कळ्या' या कथासंग्रहात 'यंत्रकर्मा' ही कथा आली आहे. या कथेत यंत्रामुळे माणूस स्वार्थी, कपटी, आळशी व हृदयशून्य कसा बनतो आहे हे सांगितले आहे. पृथ्वीवर राहणाऱ्या पुण्यराजाची पुण्याई वाढल्यामुळे इंद्र अस्वस्थ झाला होता. तेव्हा त्यांनी राजाची पुण्याई कमी करण्यासाठी पृथ्वीवर मदनाला व विश्वकर्माला पाठविले. मदनाने हर तऱ्हेने परस्त्रीकडे राजाचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी झाला. कारण राज्यात परस्त्रीचा आदरच होत नसे. सर्व स्त्रिया पतीनिष्ठ होत्या. त्या राज्यात एकही वेश्या स्त्री नव्हती कारण राज्यातल्या लहान - थोर बायकांना भरपूर काम मिळत असे त्यामुळे सुखाने पोट भरल्यामुळे पापाच्या रस्त्याकडे कुणीही जात नसे. तसेच यंत्रावर राजाने बहिष्कार घातलेला असतो. ताटात जेवले की पत्रावळी करणाऱ्याचा धंदा बुडतो. म्हणून राजा स्वत: पत्रावळीवर जेवत असे. दाराला कुलूप लावले की, पहारेकऱ्यांच्या पोटावर पाय येतो म्हणून त्याने कायद्याने कुलुपांना हद्दपार केले होते. पृथ्वीतलावरल्या इतर देशात घड्याळे सुरू झाली असली तरी राजा घटीकापत्रिकावरच काम चालवित असे. शेत नांगरायला आणि कपडे विणायला यंत्रे झाली की माणसे उपाशी मरतील अन् बेकारी वाढेल त्यामुळे त्यांनी यंत्रावर बहिष्कार घातलेला असतो. परंतु जेव्हा मदनाला पुण्य  राजाचे पुण्य नाहीसे करण्यात अपयश येते तेव्हा तो विश्वकर्माला 'यंत्रकर्मा' या नावाने दरबारात आणून महाराजांचा व त्याचा परिचय करून देतो. यंत्रकर्मा मात्र आपल्या चातुर्याने पुण्य राजाचे पुण्य नाहीसे करण्यात यशस्वी ठरतो. सृष्टी ही यंत्रमय आहे हे त्याने सिध्द केले. परंतु थोड्याच दिवसात राणी आजारी पडते. राज्यातील सर्व धन्वंतरी व अश्विनीकुमार येऊन जातात पण राणीचा आजार आटोक्यात येत नाही. तेव्हा राजा अस्वस्थ होतो. त्यावेळी यंत्रकर्मा आजार बरे व्हायचे यंत्र आणतो व चार घटकात रोग बरे व्हायचे आश्वासन देतो. तेव्हा त्याला राजा गुण आल्यास ते यंत्र राजवाड्यातील देव्हाऱ्यात देव म्हणून ठेवायचे वचन देतो अन् खरोखर राणी आजारातून बरी होते. तेव्हा राजाचा यंत्रावर गाढ विश्वास बसतो. आणि यंत्राला ईश्वराचा अवतारच समजू लागतो आणि सर्व राज्य यंत्रमय बनवतो. स्वयंपाक करण्याचे यंत्र, केर काढण्याचे यंत्र, दिवे लावण्याचे यंत्र, बिछाने घालण्याचे यंत्र राज्यात येतात परंतु त्यावेळी अनेक माणसे कामावरून कमी होतात व गल्लोगल्ली पोटासाठी अन्नासाठी वणवण फिरू लागतात. राजा यंत्रामुळे यंत्रमयच बनतो. आपली राणी रसवंतीची देखील विचारपूस करीत नाही. तेव्हा ती माहेरी निघून जाते. त्याचवेळी राज्यातून यंत्रकर्माही आपले काम संपवून निघून

जातो. दुसऱ्या दिवशी राजा आजारी पडतो. राजाचे डोके दुखू लागते तेव्हा यंत्र डोके चेपू लागते. तेव्हा यंत्राचा स्पर्श राजाला प्रेतासारखा वाटू लागतो. त्यामुळे राजाची अस्वस्थता वाढू लागते. आराम मिळत नाही. रसवंतीचा जिव्हाळा दिसून येत नाही. तेव्हा राजाला आपला जीव गुदमरल्यासारखा वाटतो. तेव्हा तो रसवंती म्हणून ओरडत सैरावैरा धावतो. त्यावेळी त्याला सगळीकडे निर्मनुष्य वस्ती दिसते. राजाच्या डोळ्यातून जेव्हा अश्रू वाहू लागतात तेव्हा यंत्र अश्रू पुसण्यास येत नाही. अशाप्रकारे एका पुण्यवान पुण्य राजाने यंत्राचा वापर केल्यामुळे त्याची पत्नी राणी रसवंती माहेरी निघून जाते. नोकर, चाकर, शिपाई, सैनिक सर्व अन्न - अन्न करत परदेशी निघून जातात. संपूर्ण गाव निर्मनुष्य होते. शेवटी राजा एकाकी बनतो. तो आजारी पडल्यावर यंत्रे त्याची सेवा करतात परंतु त्यात जिव्हाळा, प्रेम, आपुलकी या भावना नसतात तर फक्त कृत्रिमता जाणवते. 'यंत्रकर्मा' या कथेतून खांडेकरांनी यंत्रयुगामुळे मानवी समाज स्वार्थी, भोगवादी, हृदयशून्य व यंत्रवत कसा बनतो हे सांगितले आहे. या कथेतून माणूस यंत्रांमुळे यंत्रवत बनत चालला आहे ही सामाजिक समस्या त्यांनी मांडली आहे. 'दुसरा अवतार!' या कथेत खांडेकरांनी जगात जशी सज्जन माणसे आहेत तशी दुष्ट माणसेदेखील आहेत अशी दुष्ट माणसे निष्पाप लोकांचा नाहक बळी कसे घेतात याचे चित्रण केले आहे. मासा, बेडूक व कासव या तीन प्राण्यांच्या चित्रणातून खांडेकरांनी मानवी वृत्ती - प्रवृत्तीकडे लक्ष वेधले आहे. 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहात 'दुसरा अवतार!' ही कथा आली आहे. या कथेमध्ये पहिला अवतार म्हणजे परमेश्वराचा आत्मावतार, दुसरा कुर्मावतार असे परमेश्वराचे दोन अवतार मानले आहेत. यामध्ये एका डबक्यात माशाची व बेडकाची गाढ मैत्री असते. उन्हाळयात डबक्यातील पाणी कमी होते त्यामुळे मासा विहिरीत राहण्यास जातो. तिथे गेल्यावर, त्याला आपल्या मित्राची म्हणजेच बेडकाची खूप आठवण येते व बेडकालाही माशाची खूप आठवण येते त्यामुळे बेडूक माशाला भेटण्यासाठी विहिरीवर जातो. त्यावेळी बेडकास सुक्ते म्हणण्यासाठी मासा विहिरीत उतरण्यास सांगतो. त्यावेळी बेडकाला कासवाबद्दल भीती वाटते. तेव्हा मासा म्हणतो की, कासव म्हणजे परमेश्वराचा दुसरा अवतार कुर्मावतार आहे त्यामुळे तू अजिबात घाबरू नकोस असे सांगतो. पण जेव्हा विहिरीत सुक्ते म्हणण्यासाठी बेडूक तोंड उघडतो तेव्हा कासव त्याला भक्ष्य बनवते. अशाप्रकारे या कथांतून खांडेकरांनी मानवी समाजातील समस्यांचे चित्रण रूपककथातून मांडले आहे.

**४.४ निष्कर्ष:**

१) आईवाचून पोरकेपणा जर एखाद्या मुलीच्या वाट्याला आला तर त्या मुलीच्या आयुष्याची होणारी वाताहात 'हिरा तो भंगला' या कथेत पहावयास मिळते.

२) 'पूजन' या कथासंग्रहातील 'भावना' या कथेतील सामाजिक समस्या ही राजकारणी लोकांच्या जिवंतपणी अत्याचाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींची आहे.

३) समाजातील राहणीमानानुसार बदलत जाणारा वर्ग आर्थिक श्रीमंती मिळवितो परंतु वैचारिक पातळीवर मात्र खालावत राहतो हे आपल्याला 'ढगाआडचे चांदणे' या कथासंग्रहातील 'अस्थि' या कथेत पहावयास मिळते.

४) वि. स. खांडेकरांच्या कथेतील मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या ह्या परिस्थितीनुसार बदलताना दिसतात. स्वत:च्या कोशात जगणारी माणसे, शिक्षणासाठी कुटुंबातील अन्य कारणास्तव इतरत्र जातात. आपल्या वैयक्तिक दु:खापेक्षा समाजातही इतर खूप दु:ख आहेत यांचा विचार करताना ती आत्मकेंद्रातून बाहेर पडून समाजाचाही विचार करतात.

५) खांडेकरांच्या कथेतील शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या त्यांच्या अज्ञानातून निर्माण होताना दिसतात.

६) 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहातील 'यंत्रकर्मा' या कथेतून माणूस यंत्रांमुळे यंत्रवत बनत चालला आहे ही सामाजिक समस्या त्यांनी मांडली आहे.

**संदर्भ:**

१) खांडेकर सखाराम विष्णू  'भाऊबीज', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

२) खांडेकर सखाराम विष्णू , 'विद्युत्-प्रकाश', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ३३.

३) खांडेकर सखाराम विष्णू , 'पूजन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ११.

४) खांडेकर सखाराम विष्णू , 'ढगाआडचे चांदणे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५) खांडेकर सखाराम विष्णू , 'समाधीवरली फुले', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. २९.

६) खांडेकर सखाराम विष्णू , 'दवबिंदू', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

७) खांडेकर सखाराम विष्णू , 'घरट्याबाहेर', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १६.

८) खांडेकर सखाराम विष्णू , 'अश्रु आणि हास्य', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र.१.

९) खांडेकर सखाराम विष्णू , 'प्रसाद', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ९६.

१०) खांडेकर सखाराम विष्णू , 'मृगजळातील कळया', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ११.

प्रकरण ४

# वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या

## ४.१ प्रस्तावना

माझे चौथे प्रकरण आहे वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या. या प्रकरणात मी उच्च मध्यमवर्गीयांच्या, विद्यार्थ्यांच्या, मजुर कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या मांडल्या आहेत.

## ४.२ वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून दिसून येणाऱ्या सामाजिक समस्या

वि. स. खांडेकरांच्या कथासाहित्यातून चित्रित होणारी सामाजिक समस्या समाजातील अवतीभवतीच्या वातावरणापासून त्यांच्या स्वत:च्या अनुभवातून त्यांना ज्या विविध स्वरूपाच्या समस्या जाणवल्या त्या त्यांनी कथेसारख्या वाङ्मयीन कलाकृतीतून मांडल्या. हरिभाऊंच्या भाषेचाही पगडा त्यांच्या कथांतून जाणवतो. एखाद्या अडचणीत असलेल्या कुटुंबाला आपल्या घरात आश्रय दिला तर उपकार न मानता त्याची फेड उपकाराने न करता अपकारानेच केली जाते. याचे चित्रण 'भाऊबीज' या कथासंग्रहातील 'घर कोणाचे ?' या कथेत येते. ज्या सरस्वतीने पंतांना आश्रय दिला. तिलाच शेवटी आपल्या स्वत:च्या राहत्या घरातून अपमानित होऊन आजारी रघुला घेऊन घर सोडून जावे लागते. आईवाचून पोरकेपणा जर एखाद्या मुलीच्या वाट्याला आला तर त्या मुलीच्या आयुष्याची होणारी वाताहात 'विद्युतप्रकाश' या कथासंग्रहातील 'हिरा तो भंगला' या कथेत येते. केवळ पाचशे रूपयांसाठी हिराला आयुष्यभर वेंगुर्ल्याच्या सावकाराची रखेल होऊन रहावे लागते. आपला भाऊ जयवंता कोणत्याही परिस्थितीत आपल्याला पाचशे रुपये मावशीला देऊन सोडवील ही हिराची आशा फोल ठरते. या कथेतील सावकाराकडून या मुलीवर अत्याचार होतात. या परिस्थितीत ती मुलगी आपलाच दोष समजून मुंबईला जाते. मुंबईसारख्या मायावी नगरीत तिला स्वत:चे पोट भरण्यासाठी शरीरविक्रयाचा व्यवसाय करावा लागतो. 'पूजन' या कथासंग्रहातील 'भावना' या कथेतील सामाजिक समस्या ही राजकारणी लोकांच्या जिवंतपणी अत्याचाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींची आहे. आपल्या हाती सत्ता आहे. तेव्हा आपण कोणत्याही प्रकारची मनमानी करू शकतो हा त्यांचा अहंकार सहजपणे दुसऱ्याचे आयुष्य उध्वस्त करून जातो.

### ४.२.१ उच्च मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या

स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधीची उच्चवर्गीय किंवा मध्यमवर्गीयांची स्थिती ही एका विशिष्ट परिस्थितीशी निगडीत होती. होता होईल तेवढे आपल्या कनिष्ठ वर्गाचे शोषण करणे आणि आपण आपले स्थान निश्चित करावे याकडे त्यांचा कल होता. शिक्षण, व्यवहारज्ञान यांचा अभाव असणाऱ्याचीच जास्त पिळवणूक होत असे. चांगले विचार, चांगली वाट याच्या माध्यमातून जीवनाला चांगले मिळालेले वळण इतरांकडे पाहताना माणुसकीच्या नात्याने पहावयास शिकवते असे प्रत्येकवेळीच घडत नाही. कधी वेगळा विचारही मनात येऊ लागतो. दुसऱ्यांच्या विषयी किंवा आपल्या समाजातील लोकांविषयी मनात असूया निर्माण होऊ लागते. 'ढगाआडचे चांदणे' या कथासंग्रहातील 'अस्थि' या कथेतील संपत हा गरिबीतून पुढे जाऊन राजकारण श्रीमंती या उच्चवर्गीयात स्थिरावलेल्या सामाजिक स्तराचा प्रतिनिधी ठरतो. त्याला आपल्या पूर्वायुष्याचा विसर पडतो. ज्या जनतेने आपल्यावरती विश्वास ठेवला त्यांचीच हा वैचारिक पातळीवर अवहेलना चालवितो. समाजातील राहणीमानानुसार बदलत जाणारा वर्ग आर्थिक श्रीमंती मिळवितो परंतु वैचारिक पातळीवर मात्र खालावत राहतो. 'हस्ताचा पाऊस' या कथासंग्रहातील 'बाहुली' या कथेत डॉ. विश्वनाथ आपल्या व्यवसायात रमून जातो. तर त्याच्याबरोबर चळवळीत काम करणारी दुर्गा भूमिगत होते. खांडेकरांच्या या कथेत चित्रित केलेली मध्यमवर्गीयांची समस्या स्वातंत्र्यप्रेरणेने भारावलेल्या देशभक्तांच्या बाजूने त्या विचारांचे क्षेत्र; विधायक कार्यकर्ते मानवसेवेतून आपले जीवन पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न करतात. तर काही वेळा पाठही फिरवितात. रक्ताच्या नात्यातील पडत  चाललेला विसर ‘घरट्याबाहेर’ या कथासंग्रहातील 'पतीत' या कथेतील मधुकराच्या स्वार्थातून चित्रित होतो. चंगळवादाच्या पाठीमागे  लागणाऱ्या माणसांची मने स्वत:च्या रक्ताची नातीसुध्दा विसरतात. समाजातील ‘पतीत’ प्रवृत्ती ठिकठिकाणी स्वार्थासाठी माणुसकी विसरतात. वि. स. खांडेकरांच्या कथेतील मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या ह्या परिस्थितीनुसार बदलताना दिसतात. स्वत:च्या कोशात जगणारी माणसे, शिक्षणासाठी कुटुंबातील अन्य कारणास्तव इतरत्र जातात. तिथे त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव येतात. तिथल्या वातावरणाचे संस्कार होतात. त्यातून कोणी स्वत:ची नाती विसरून एका वेगळ्या विश्वाचा विचार करतात तर, आपल्या वैयक्तिक दु:खापेक्षा समाजातही इतर खूप दु:ख आहेत यांचा विचार करताना ती आत्मकेंद्रातून बाहेर पडून समाजाचाही विचार करतात.

### ४.२.२ विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्या

‘समाधीवरली फुले’ या कथासंग्रहात ‘आज आणि उद्या’ ही कथा आली आहे. या कथेतील दादा डॉक्टरकीचे शिक्षण घेऊन एका विधवेशी की जिच्या पदरी मनी नावाची एक मुलगी आहे तिच्याशी विवाह करतो. पुढे ती मनी मोठी झाल्यावर कामगारांच्या चळवळीत भाग घेते. चळवळीत भाग घेतल्यामुळे पतीचा विरोध होतो आहे हे तिच्या लक्षात येताच ती वेगळं राहण्याचा निर्णय घेते. यावरून ‘आज आणि उद्या’ या कथेतून बदलत्या सामाजिक मनाचे चित्रण, दोन पिढ्यातील वैचारिक संघर्ष मांडत असताना बदलत्या विचारसरणीच्या सामाजिक समस्या मांडल्या आहेत. 'दवबिंदू' या कथासंग्रहात ‘चंद्रकोर’ ही कथा आली आहे. या कथेतील अंतोनचे इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी वसंताच्या वडिलांनी अंतोनच्या वडिलांच्या दुकानात दारू पिणे आवश्यक ठरते आहे असे का ? याचा उलगडा मात्र छोट्या अंतोनला होतच नाही. त्याच्या शंकेचे निरसन करताना ‘ असलं श्रीमंत गिऱ्हाईक गेलं तर पैसे कुठून मिळणार तुला शिकायला ?’ असे त्याच्या वडिलांना अंतोनसमोर स्पष्ट बोलावे लागते. या कथेतून मांडलेली समस्या गरीब कुटुंबातील एका आजीचा आपल्या नातवाच्या शिक्षणाला आधार वाटतो. ती आपल्या विधवा सुनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. तिसरीपर्यंत मराठी शिक्षण त्यानंतर मॅट्रिकपर्यंत इंग्रजी शिक्षण घेऊन भिन्न ओळखीने मुंबईला जातो. तिथे त्याला नोकरी मिळतच नाही तर शिक्षण आणि माणुसकी यांच्याशी जवळीक साधणारे वर्तनही त्याला कुठे दिसत नाही. आपल्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या आजीला, आईला, बहिणीला आपल्यापेक्षा लहान भावांना आपण सुखी करू असे भिवाला वाटते. परंतु प्रत्येक वेळेला त्याला निराश व्हावे लागते. त्याच्या कुटुंबाबरोबर त्याच्या गावातल्या लोकांनाही भिवाच्या नोकरीचे कुतूहल असते. ह्यानंतर आजीचे आजारपण, शेतीतील करावी लागणारी कामे त्याला नकोशी वाटू लागतात. शहरातील डोळ्यांनी पाहिलेले पांढरपेशेपण त्याच्याभोवती पिंगा घालू लागते. त्याला घरचे, शेतीचे काम कमी दर्जाचे वाटू लागते. इंग्रजी विचारांचा पगडा त्याच्या मनावर पडलेला असतो. ‘कर्तव्यनिष्ठा’ या गुणाच्या आधारावर त्याच्यावरती केलेले संस्कार त्याला आपल्या पूर्वजांच्या कष्टाची जाणीव करून देतो. आपले पूर्वज अशिक्षित असले तरी त्यांची जीवनावर असणारी निष्ठा. ती निष्ठा त्याला शहाणपण शिकविते. यातून खेडेगावातील इंग्रजी शिक्षण हे गरिबांसाठी नाही ती एका विशिष्ट वर्गाचीच मक्तेदारी ठरते.

### ४.२.३ मजुर कामगारांच्या सामाजिक समस्या

अपुरे शिक्षण ही पण कामगारांची समस्या असते. ‘घरट्याबाहेर’ या कथासंग्रहात ‘नवे जग’ ही कथा आली आहे. या कथेतील वामन मॅट्रिकनंतर आपल्या घरची खाणारी वाढलेली तोंडे या साऱ्याला वैतागत असतो. आपल्या आजारी मुलाला औषध आणण्यास तो असमर्थ ठरतो याचे कारण मुंबईतील गिरणीच्या संपाची झळ त्याच्या घरापर्यंत पोहोचलेली असते. त्याच्या भावाचे कुटुंबही गावी परत आलेले असते. डॉक्टर माणुसकी व आपले कर्तव्य समजून त्याच्या मुलासाठी औषध देतात अशाप्रकारे मालक आणि कामगार यांच्यातील लढा काही ठिकाणी माणुसकीचे दर्शन घडवितो. तर काही ठिकाणी माणुसकीची घुसमट करताना दिसतो. ‘अश्रु आणि हास्य’ या कथासंग्रहात ‘मुके प्रेम’ ही कथा आली आहे. जयराम हा या कथेतला नायक आहे. त्याला मुलगा झाल्यावर त्याची बायको मरण पावते. जन्म:त शरीराला असणारे आपल्या अपत्याचे अधूपण या कामगाराच्या मार्गातील अडसर होतो. ही माणसे कष्टाच्यामागे धावतच असतात. ही कामगाराची समस्या या कथेतून त्यांनी मांडली आहे.

### ४.२.४ शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या

‘घरट्याबाहेर’ या कथासंग्रहात ‘घरट्याबाहेर’ ही कथा आली आहे. आजारपणात वेळेवर न मिळणारे औषधपाणी, त्याची अविचारामुळे होणारी फरफट ओढावून घेतलेला मृत्यू याचे चित्रण ‘घरट्याबाहेर’ या कथेत मंजुळेच्या बाबतीत घडते. तिचा नवरा न्युमोनियाने आजारी असतो. शेतकरी कुटुंबाला आजारी पडल्यानंतर आर्थिक अडचणीमुळे परगावांहून डॉक्टर आणणे परवडणारे नसते. त्याच्यावर उपचार करणारे त्याचे शेजारी डोके चिरून त्यात कसल्यातरी झाडपाल्याचे औषध भरतात. त्यातच मंजुळेच्या पतीचा मृत्यू होतो. परंपरेनुसार चालत आलेल्या आपला भिक्षुकीचा व्यवसाय व गरजेपुरते शेत याच परंपरांना चिकटून राहिल्यामुळे ‘प्रसाद’ या कथासंग्रहातील ‘पार्वती’ या कथेतील पार्वतीला कोणताही दोष नसताना अन्यायच सहन करावा लागतो. तिच्या पतीला वेगवेगळे व्यवसायांचा प्रयोग करून बघण्याची सवय असल्यामुळे त्याचा कोणताच व्यवसाय चालत नाही. धंद्यातील खोट तो पचवू शकत नाही. बिचारी पार्वती विधवा होते. तिला माधवने व्यवहारापुरते मराठी लिहायला - वाचायला शिकविलेले त्यामुळे तिची शिकण्याची आवड आणखी पुढे गेलेली असते. ती थोडीफार इंग्रजीही शिकते व माधवजवळ नर्स होण्याची इच्छा व्यक्त करते. परंतु तिचे वडील विठोबाअण्णा यांना पार्वतीचा विचार पटत नाही. ते पाताळेश्वराला कौल लावतात. पाताळेश्वर नकाराचा कौल देतो. पार्वतीने पाताळेश्वराची सेवा करावी असे ठरते. गरजेपेक्षाही कमी असणारी शेतजमीन त्यांच्या कुटुंबाची कोणत्याही प्रकारची गरज पूर्ण करू

शकत नाही. त्यांचा मुलगा निळकंठ हा पण नाटक कंपनीत काम करतो. तिथे त्याला दाम गरजेपुरते मिळत नाही. खांडेकरांच्या कथेतील शेतकऱ्यांच्या समस्या त्यांच्या अज्ञानातून निर्माण होताना दिसतात. मोठ्या प्रमाणात कष्ट करूनही त्यांच्या प्राथमिक गरजा भागत नाहीत.

## ४.३ वि. स. खांडेकरांच्या रूपककथेतील सामाजिक समस्या

मानवाच्या स्वार्थी स्वभावामुळे त्याच्यातील माणुसकी नष्ट होत चालली आहे. खांडेकरांनी मानवी जीवनातील, मनातील हिंसा, अहंकार, स्वार्थी वृत्तीतून सामाजिक समस्या निर्माण होतात हे रूपककथेतूनही सांगितले आहे. 'मृगजळातील कळ्या' या कथासंग्रहात 'यंत्रकर्मा' ही कथा आली आहे. या कथेत यंत्रामुळे माणूस स्वार्थी, कपटी, आळशी व हृदयशून्य कसा बनतो आहे हे सांगितले आहे. पृथ्वीवर राहणाऱ्या पुण्यराजाची पुण्याई वाढल्यामुळे इंद्र अस्वस्थ झाला होता. तेव्हा त्यांनी राजाची पुण्याई कमी करण्यासाठी पृथ्वीवर मदनाला व विश्वकर्माला पाठविले. मदनाने हर तऱ्हेने परस्त्रीकडे राजाचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी झाला. कारण राज्यात परस्त्रीचा आदरच होत नसे. सर्व स्त्रिया पतीनिष्ठ होत्या. त्या राज्यात एकही वेश्या स्त्री नव्हती कारण राज्यातल्या लहान - थोर बायकांना भरपूर काम मिळत असे त्यामुळे सुखाने पोट भरल्यामुळे पापाच्या रस्त्याकडे कुणीही जात नसे. तसेच यंत्रावर राजाने बहिष्कार घातलेला असतो. ताटात जेवले की पत्रावळी करणाऱ्याचा धंदा बुडतो. म्हणून राजा स्वत: पत्रावळीवर जेवत असे. दाराला कुलूप लावले की, पहारेकऱ्यांच्या पोटावर पाय येतो म्हणून त्याने कायद्याने कुलुपांना हद्दपार केले होते. पृथ्वीतलावरल्या इतर देशात घड्याळे सुरू झाली असली तरी राजा घटीकापत्रिकावरच काम चालवित असे. शेत नांगरायला आणि कपडे विणायला यंत्रे झाली की माणसे उपाशी मरतील अन् बेकारी वाढेल त्यामुळे त्यांनी यंत्रावर बहिष्कार घातलेला असतो. परंतु जेव्हा मदनाला पुण्य  राजाचे पुण्य नाहीसे करण्यात अपयश येते तेव्हा तो विश्वकर्माला 'यंत्रकर्मा' या नावाने दरबारात आणून महाराजांचा व त्याचा परिचय करून देतो. यंत्रकर्मा मात्र आपल्या चातुर्याने पुण्य राजाचे पुण्य नाहीसे करण्यात यशस्वी ठरतो. सृष्टी ही यंत्रमय आहे हे त्याने सिध्द केले. परंतु थोड्याच दिवसात राणी आजारी पडते. राज्यातील सर्व धन्वंतरी व अश्विनीकुमार येऊन जातात पण राणीचा आजार आटोक्यात येत नाही. तेव्हा राजा अस्वस्थ होतो. त्यावेळी यंत्रकर्मा आजार बरे व्हायचे यंत्र आणतो व चार घटकात रोग बरे व्हायचे आश्वासन देतो. तेव्हा त्याला राजा गुण आल्यास ते यंत्र राजवाड्यातील देव्हाऱ्यात देव म्हणून ठेवायचे वचन देतो अन् खरोखर राणी आजारातून बरी होते. तेव्हा राजाचा यंत्रावर गाढ विश्वास बसतो. आणि यंत्राला ईश्वराचा अवतारच समजू लागतो आणि सर्व राज्य यंत्रमय बनवतो. स्वयंपाक करण्याचे यंत्र, केर काढण्याचे यंत्र, दिवे लावण्याचे यंत्र, बिछाने घालण्याचे यंत्र राज्यात येतात परंतु त्यावेळी अनेक माणसे कामावरून कमी होतात व गल्लोगल्ली पोटासाठी अन्नासाठी वणवण फिरू लागतात. राजा यंत्रामुळे यंत्रमयच बनतो. आपली राणी रसवंतीची देखील विचारपूस करीत नाही. तेव्हा ती माहेरी निघून जाते. त्याचवेळी राज्यातून यंत्रकर्माही आपले काम संपवून निघून

जातो. दुसऱ्या दिवशी राजा आजारी पडतो. राजाचे डोके दुखू लागते तेव्हा यंत्र डोके चेपू लागते. तेव्हा यंत्राचा स्पर्श राजाला प्रेतासारखा वाटू लागतो. त्यामुळे राजाची अस्वस्थता वाढू लागते. आराम मिळत नाही. रसवंतीचा जिव्हाळा दिसून येत नाही. तेव्हा राजाला आपला जीव गुदमरल्यासारखा वाटतो. तेव्हा तो रसवंती म्हणून ओरडत सैरावैरा धावतो. त्यावेळी त्याला सगळीकडे निर्मनुष्य वस्ती दिसते. राजाच्या डोळ्यातून जेव्हा अश्रू वाहू लागतात तेव्हा यंत्र अश्रू पुसण्यास येत नाही. अशाप्रकारे एका पुण्यवान पुण्य राजाने यंत्राचा वापर केल्यामुळे त्याची पत्नी राणी रसवंती माहेरी निघून जाते. नोकर, चाकर, शिपाई, सैनिक सर्व अन्न - अन्न करत परदेशी निघून जातात. संपूर्ण गाव निर्मनुष्य होते. शेवटी राजा एकाकी बनतो. तो आजारी पडल्यावर यंत्रे त्याची सेवा करतात परंतु त्यात जिव्हाळा, प्रेम, आपुलकी या भावना नसतात तर फक्त कृत्रिमता जाणवते. 'यंत्रकर्मा' या कथेतून खांडेकरांनी यंत्रयुगामुळे मानवी समाज स्वार्थी, भोगवादी, हृदयशून्य व यंत्रवत कसा बनतो हे सांगितले आहे. या कथेतून माणूस यंत्रांमुळे यंत्रवत बनत चालला आहे ही सामाजिक समस्या त्यांनी मांडली आहे. 'दुसरा अवतार!' या कथेत खांडेकरांनी जगात जशी सज्जन माणसे आहेत तशी दुष्ट माणसेदेखील आहेत अशी दुष्ट माणसे निष्पाप लोकांचा नाहक बळी कसे घेतात याचे चित्रण केले आहे. मासा, बेडूक व कासव या तीन प्राण्यांच्या चित्रणातून खांडेकरांनी मानवी वृत्ती - प्रवृत्तीकडे लक्ष वेधले आहे. 'मृगजळातील कळ्या' या कथासंग्रहात 'दुसरा अवतार!' ही कथा आली आहे. या कथेमध्ये पहिला अवतार म्हणजे परमेश्वराचा आत्मावतार, दुसरा कुर्मावतार असे परमेश्वराचे दोन अवतार मानले आहेत. यामध्ये एका डबक्यात माशाची व बेडकाची गाढ मैत्री असते. उन्हाळ्यात डबक्यातील पाणी कमी होते त्यामुळे मासा विहिरीत राहण्यास जातो. तिथे गेल्यावर, त्याला आपल्या मित्राची म्हणजेच बेडकाची खूप आठवण येते व बेडकालाही माशाची खूप आठवण येते त्यामुळे बेडूक माशाला भेटण्यासाठी विहिरीवर जातो. त्यावेळी बेडकास सुक्ते म्हणण्यासाठी मासा विहिरीत उतरण्यास सांगतो. त्यावेळी बेडकाला कासवाबद्दल भीती वाटते. तेव्हा मासा म्हणतो की, कासव म्हणजे परमेश्वराचा दुसरा अवतार कुर्मावतार आहे त्यामुळे तू अजिबात घाबरू नकोस असे सांगतो. पण जेव्हा विहिरीत सुक्ते म्हणण्यासाठी बेडूक तोंड उघडतो तेव्हा कासव त्याला भक्ष्य बनवते. अशाप्रकारे या कथांतून खांडेकरांनी मानवी समाजातील समस्यांचे चित्रण रूपककथातून मांडले आहे.

**४.४ निष्कर्ष:**

१) आईवाचून पोरकेपणा जर एखाद्या मुलीच्या वाट्याला आला तर त्या मुलीच्या आयुष्याची होणारी वाताहात 'हिरा तो भंगला' या कथेत पहावयास मिळते.

२) 'पूजन' या कथासंग्रहातील 'भावना' या कथेतील सामाजिक समस्या ही राजकारणी लोकांच्या जिवंतपणी अत्याचाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींची आहे.

३) समाजातील राहणीमानानुसार बदलत जाणारा वर्ग आर्थिक श्रीमंती मिळवितो परंतु वैचारिक पातळीवर मात्र खालावत राहतो हे आपल्याला 'ढगाआडचे चांदणे' या कथासंग्रहातील 'अस्थि' या कथेत पहावयास मिळते.

४) वि. स. खांडेकरांच्या कथेतील मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या ह्या परिस्थितीनुसार बदलताना दिसतात. स्वत:च्या कोशात जगणारी माणसे, शिक्षणासाठी कुटुंबातील अन्य कारणास्तव इतरत्र जातात. आपल्या वैयक्तिक दु:खापेक्षा समाजातही इतर खूप दु:ख आहेत यांचा विचार करताना ती आत्मकेंद्रातून बाहेर पडून समाजाचाही विचार करतात.

५) खांडेकरांच्या कथेतील शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या त्यांच्या अज्ञानातून निर्माण होताना दिसतात.

६) 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहातील 'यंत्रकर्मा' या कथेतून माणूस यंत्रांमुळे यंत्रवत बनत चालला आहे ही सामाजिक समस्या त्यांनी मांडली आहे.

**संदर्भ:**

१) खांडेकर सखाराम विष्णू  'भाऊबीज', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

२) खांडेकर सखाराम विष्णू , 'विद्युत्-प्रकाश', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ३३.

३) खांडेकर सखाराम विष्णू , 'पूजन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ११.

४) खांडेकर सखाराम विष्णू , 'ढगाआडचे चांदणे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५) खांडेकर सखाराम विष्णू , 'समाधीवरली फुले', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. २९.

६) खांडेकर सखाराम विष्णू , 'दवबिंदू', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

७) खांडेकर सखाराम विष्णू , 'घरट्याबाहेर', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १६.

८) खांडेकर सखाराम विष्णू , 'अश्रु आणि हास्य', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र.१.

९) खांडेकर सखाराम विष्णू , 'प्रसाद', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ९६.

१०) खांडेकर सखाराम विष्णू , 'मृगजळातील कळया', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ११.

प्रकरण ५

# निष्कर्ष

## समारोप

‘ वि. स. खांडेकर यांच्या निवडक कथासंग्रहांचा अभ्यास ’ हा माझ्या प्रबंधाचा विषय आहे. या प्रबंधात मी एकूण पाच प्रकरणं मांडली आहेत. माझ्या प्रबंधाचं पहिलं प्रकरण आहे लघुकथा : संकल्पना व स्वरूप, इतिहास. दुसरं प्रकरण आहे वि. स. खांडेकरांच्या कथेमधून दिसून येणारी जीवनवादी दृष्टी. तिसरं प्रकरण आहे वि. स. खांडेकरांच्या कथालेखनातून दिसून येणारा वास्तववाद.चौथं प्रकरण आहे वि. स. खांडेकरांच्या कथासंग्रहांतून चित्रित झालेल्या सामाजिक समस्या आणि पाचवं प्रकरण आहे निष्कर्ष. या प्रबंधात मी खांडेकरांच्या कथांचा जीवनवादी, वास्तववादी दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. तसेच खांडेकरांनी चित्रित केलेल्या सामाजिक समस्याही मांडल्या आहेत.

**निष्कर्ष:**

१) ‘कथ्’ या मूळ धातूपासून ‘कथा’ हा शब्द रूढ झाला आहे.

२) लक्षवेधी, सोप्या, सुटसुटीत आणि रसाळ शब्दांत पूर्वी गोष्ट सांगितली जात असे. या श्रवण-गोष्टीतून मनोरंजन व अप्रत्यक्षपणे बोध देण्याचा प्रयत्न होत असे.

३) मानवाच्या स्वत:च्या जीवनातील प्रसंगांचे वर्णन करण्याच्या प्रवृत्तीतून कथेचा उदय झाला.

४) १९२६ ते १९४५ हा कालखंड मराठी लघुकथेच्या दृष्टीने उमेदवारीचा कालखंड मानला जातो. या काळातील महत्वाचे कथालेखक दिवाकर कृष्ण, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांनी भरीव कथालेखन केले.

५) मनोरंजन करणारी, आकर्षक शैलीने सांगितलेली व तंत्राच्या चौकटीत बसवलेली अशी फडक्यांची कथा आहे.

६) विषयांचे वैचित्र्य व नाविन्य, तंत्राची विविधता, सुभाषितवजा शैली व काव्यात्मकता असे खांडेकरांच्या कथेचे स्वरूप आहे.

**निष्कर्ष:**

१) माणसाची मूलभूत प्रेरणा आहे जगावे व मनासारखे जगावे याची जाणीव करून त्याच्या परिपूर्तीचा मार्ग सांगणारा विचार म्हणजे जीवनवाद.

२) वि. स. खांडेकरांनी आपल्या कथांमधून जीवनमूल्ये मांडली आहेत.

३) 'सूर्यकमळे' या कथासंग्रहातील 'कोकिळा' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने जीवनात स्वत:जवळ असलेल्या कोणत्याही चांगल्या गुणाचा, कौशल्याचा अभिमान बाळगू नये.

४) 'कलिका' या कथासंग्रहातील 'परिस' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला कधीही कोणत्याही वस्तुचा मोह असता कामा नये. या मोहामुळे माणसाच्या मनात मत्सर, राग इत्यादी भावना उत्पन्न होतात. आणि मग माणूस रागाच्या भरात चुकीच्या निर्णयाकडे पोचतो.

५) 'मृगजळातील कळया' या कथासंग्रहातील 'चकोर व चातक' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाला जीवनात काही मिळवायचं असेल तर त्याने संयम बाळगला पाहिजे.

६) 'अहंकार' या कथेतून खांडेकरांचा जीवनवादी दृष्टिकोन अशाप्रकारे दिसून येतो की माणसाने कधीही अहंकार बाळगू नये. कारण अहंकाराची किंमत शून्य असते.

**निष्कर्ष:**

१) वास्तववाद म्हणजे व्यक्ती, प्रसंग, वस्तू, घटिते आदींचे म्हणजेच जीवनाचे यथातथ्य आविष्करण होय.

१) 'भाऊबीज' या कथासंग्रहातील 'नीच कोण ?' या कथेतून त्या काळातील सावकार गरीबांचं कशाप्रकारे शोषण करायचे हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

२) 'वनदेवता' या कथासंग्रहातील 'मासे' या कथेतून उच्च वर्गाकडून खालच्या वर्गाची होत असलेली पिळवणूक हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

४) 'सुवर्णकण' या कथासंग्रहातील 'बुजगबाहुले' या कथेतून जगात चिरंतन धर्म एकच आहे - भक्ती, प्रीती ! भीती किंवा शक्ती हा नव्हे हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

५) 'मृगजळातील कळ्या' या कथासंग्रहातील 'एक तळे' या कथेतून स्वत:च्या स्वार्थासाठी परार्थाची हानी करताना माणूस अंधपणाने वागतो आणि स्वार्थ साधल्यानंतर तिचे गुणगान करीत बसतो. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

६) 'कलिका' या कथासंग्रहातील 'मोत्याचे पीक' या कथेतून माणसाला जगण्यासाठी मोत्यांहूनही अन्न महत्वाचं आहे. कारण अन्नावाचून माणूस जगूच शकत नाही. हे वास्तव या कथेतून खांडेकरांनी मांडले आहे.

**निष्कर्ष:**

१) आईवाचून पोरकेपणा जर एखाद्या मुलीच्या वाट्याला आला तर त्या मुलीच्या आयुष्याची होणारी वाताहात ‘हिरा तो भंगला’ या कथेत पहावयास मिळते.

२) ‘पूजन’ या कथासंग्रहातील ‘भावना’ या कथेतील सामाजिक समस्या ही राजकारणी लोकांच्या जिवंतपणी अत्याचाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींची आहे.

३) समाजातील राहणीमानानुसार बदलत जाणारा वर्ग आर्थिक श्रीमंती मिळवितो परंतु वैचारिक पातळीवर मात्र खालावत राहतो हे आपल्याला ‘ढगाआडचे चांदणे’ या कथासंग्रहातील ‘अस्थि’ या कथेत पहावयास मिळते.

४) वि. स. खांडेकरांच्या कथेतील मध्यमवर्गीयांच्या सामाजिक समस्या ह्या परिस्थितीनुसार बदलताना दिसतात. स्वत:च्या कोशात जगणारी माणसे, शिक्षणासाठी कुटुंबातील अन्य कारणास्तव इतरत्र जातात. आपल्या वैयक्तिक दु:खापेक्षा समाजातही इतर खूप दु:ख आहेत याचा विचार करताना ती आत्मकेंद्रातून बाहेर पडून समाजाचाही विचार करतात. खांडेकरांच्या कथेतील शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या त्यांच्या अज्ञानातून निर्माण होताना दिसतात.

५) ‘मृगजळातील कळया’ या कथासंग्रहातील ‘यंत्रकर्मा’ या कथेतून माणूस यंत्रांमुळे यंत्रवत बनत चालला आहे ही सामाजिक समस्या त्यांनी मांडली आहे.

# परिशिष्ट
# छायाचित्रे

## वि. स.खांडेकर यांचे शिरोडा येथील स्मृतिसंग्रहालयातील छायाचित्र



# वि. स. खांडेकर यांचे शिरोडा येथील छायाचित्र



# वि. स. खांडेकरांना मिळालेला ज्ञानपीठ पुरस्कार



# वि. स. खांडेकर यांचे कथासंग्रह












# संदर्भग्रंथ

१) खांडेकर सखाराम विष्णू , 'प्रसाद', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

२) खांडेकर सखाराम विष्णू , 'सूर्यकमळे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ५७.

३) खांडेकर सखाराम विष्णू , 'कलिका', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ४४.

४) खांडेकर सखाराम विष्णू , 'मृगजळातील कळ्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ८१.

५) खांडेकर सखाराम विष्णू , 'अश्रु आणि हास्य', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १०३.

६) खांडेकर सखाराम विष्णू , 'सरत्या सरी', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ८.

७) खांडेकर सखाराम विष्णू , 'भाऊबीज', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. २१.

८) खांडेकर सखाराम विष्णू , 'क्षितिजस्पर्श', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ३४.

९) खांडेकर सखाराम विष्णू , 'वनदेवता', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ७७.

१०) खांडेकर सखाराम विष्णू , 'फुले आणि दगड', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ५३.

११) खांडेकर सखाराम विष्णू , 'सुवर्णकण', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ४९.

१२) खांडेकर सखाराम विष्णू , 'विकसन', (संपा.) डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १०८.

१३) खांडेकर सखाराम विष्णू , 'विद्युत्-प्रकाश', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. ३३.

१४) खांडेकर सखाराम विष्णू , 'पूजन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ११.

१५) खांडेकर सखाराम विष्णू , 'समाधीवरली फुले', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. २९.

१६) खांडेकर सखाराम विष्णू , 'दवबिंदू', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १.

१७) खांडेकर सखाराम विष्णू , 'घरट्याबाहेर', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. क्र. १६.